# नवाकाळ
एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, गुरुवार ११ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९८, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 98 Marathi - Daily - Mumbai, 11 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

"मुंबईत राहून, मुंबईतल्या नोकरीसाठी आम्ही जायचं कुठे?"

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews


## थोडक्यात...

### बेस्टचा आणरवी एक अपघात! २ जरवमी

**मुंबई-** मुंबईच्या दादर परिसरात दोन दिवसांपूर्वी बेस्ट बसचा अपघात झाला होता. यात एका तरुणाचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच मुंबईतील कांदिवली परिसरात एका बेस्ट बसने दोन पादचाऱ्यांना धडक दिल्याची घटना उघड झाली आहे. हा अपघात ८ जून रोजी सकाळी ११.४० वाजताच्या सुमारास पोईसर डेपोजवळ घडला होता. मात्र या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ आज व्हायरल होत आहे. गोराई डेपोच्या बसने रस्त्यावरून चालत असलेल्या दोघांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात सोनम मौर्य (२४) आणि आदर्श यादव (२४) जरवमी झाले.

### करचुकवेगिरी प्रकरणी अनिल अंबानींना दिलासा


**मुंबई-** ४२० कोटी रुपयांच्या करचुकवेगिरी प्रकरणात उद्योगपती अनिल अंबानी यांना मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम दिलासा दिला.अघोषित विदेशी उत्पन्न व मालमत्तेसंबंधी कायद्यांतर्गत होणाऱ्या दंडात्मक आणि फौजदारी कारवाईला न्यायालयाने स्थगिती देत केंद्र सरकारला याचिकेवर उत्तर दारवल करण्याचे निर्देश दिले. अंबानी यांनी या कायद्यातील काही तरतुदींच्या घटनात्मक वैधतेलाच आव्हान देत उच्च न्यायालयात याचिका दारवल केली होती. न्या. बी. पी. कोलाबावाला आणि न्या. फिरदौस पूनीवाला यांच्या रवंडपीठासमोरील सुनावणीत न्यायालयाने स्पष्ट केले की, याचिकेचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंबानींवर रवटला दारवल करू नये.

# मुंबईत २५ लारवांची नोकरी! पण मराठी नकोत
## फक्त गुजराती-मारवाडींसाठी ऑफर! संतापाची लाट

■ मुंबई

**मुंबईत नोकरीच्या जाहिरातीवरून पुन्हा एकदा स्थानिक विरुद्ध अमराठी असा वाद उफाळून आला आहे. एका खासगी कंपनीने लिंक्डइन व नोकरी डॉट कॉम, या व्यावसायिक सोशल नेटवर्किंग संकेतस्थळावर दिलेल्या नोकरीच्या जाहिरातीत 'फक्त गुजराती किंवा मारवाडी उमेदवारांनी अर्ज करावा' अशी अट घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे वार्षिक सुमारे २५ लाख रुपयांचे पॅकेज असलेल्या नोकरीसाठी मराठी उमेदवारांना डावलण्यात आल्याचा आरोप होत आहे.**

**या प्रकरणावरून** महाराष्ट्र एकीकरण समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख म्हणाले की, दोन दिवसांत ही कोणती कंपनी आहे ते शोधून काढून आम्ही थेट कारवाई करू. या प्रकरणातील पुढील परिणामांसाठी सरकार जबाबदार असेल. संबंधितांवर तातडीने दंडात्मक व कायदेशीर कारवाई करून गुन्हा नोंद करावा. मराठींसाठी हिंसा नको, असे म्हणणारे मुख्यमंत्री आता संबंधित यंत्रणेला आदेश देऊन कारवाई करतील का? राज्यातील असे प्रकार थांबवले जातील का? मुंबईत मराठी माणसाला नोकरी मिळत नाही. परप्रांतीय विशेषतः काही गुजराती कंपन्या मराठी उमेदवारांना डावलतात. मराठींना प्राधान्य देण्याची सक्ती झाली पाहिजे. मराठी




माणसाच्या अस्तित्वाचा आणि रोजगाराचा प्रश्न सोडवणे अत्यंत गरजेचे आहे. अर्थकारण बदलून नोकरी-व्यवसायात मराठींना प्राधान्य मिळाले तरच खऱ्या अर्थाने परिस्थिती बदलेल.

टीका झाल्यावर अहमदाबादच्या भरती एजन्सीकडून वादग्रस्त जाहिरातीवर स्पष्टीकरण देण्यात आले आहे. कंपनीने म्हटले आहे की, आमची कंपनी ही रिक्रुटमेंट कंपनी आहे. प्लेसमेंट देण्याचे काम आमच्या कंपनीकडून केले जाते. विविध पान ७ वर

# उरी सेक्टरमध्ये भीषण स्फोट महाराष्ट्राचे दोन सुपुत्र शहीद

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीरमधील** उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ झालेल्या भीषण



स्फोटात महाराष्ट्रातील दोन जवान शहीद झाल्याने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली. नवी मुंबईतील ऐरोलीचे विक्रम चव्हाण आणि सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील शाहपूरचे अर्जुन जाधव यांनी देशसेवेवर कार्यरत असताना वीरमरण आले. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून राज्यभरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

काल संध्याकाळी उरी सेक्टरमधील कमलकोट भागात नियंत्रण रेषेजवळ लष्कराच्या तैनातीदरम्यान अचानक स्फोट झाला. या स्फोटात दोन जवान गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने बचाव पथकाच्या मदतीने श्रीनगर येथील लष्कराच्या ९२ बेस पान २ वर

# 'कोडिंग' इतिहासजमा होणार इलॉन मस्क यांचे भाकीत

■ वॉशिंग्टन

**कृत्रिम** बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या झपाट्यामध्ये संगणक क्षेत्रातील कोडिंग म्हणजेच संगणक, मोबाईल ॲप, वेबसाईट किंवा सॉफ्टवेअरला काय काम करायचे हे विशिष्ट प्रोग्रॅमिंग भाषेत लिहून सांगण्याचे काम करणाऱ्या लोकांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. अमेरिकेचे अब्जाधीश उद्योगपती इलॉन मस्क यांनी तर कोडींगचे काम माणसाच्या हातून करून घेणे वर्षभरात इतिहासजमा होईल, असे भाकीत केले आहे. अँथ्रोपिकचे क्लाउड कोड, ओपन एआयचे कोडेक्स यांसारख्या एआय आधारित टुल्समुळे कोडिंगच्या क्षेत्रात आमुलाग्र क्रांती केली आहे. ही टुल्स संपूर्ण कोडिंगचे काम करणाऱ्या तंत्रज्ञांपेक्षा कितीतरी पट वेगाने कामे करू शकतात. आवश्यक चाचण्या करतात आणि सॉफ्टवेअरमध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्याचे निवारणही स्वतःहून म्हणजे माणसाने सूचना देण्याआधीच करतात. त्यामुळे कोडिंगचे क्षेत्र आता पहिल्यासारखे राहिलेले नाही. एआयचा शिरकाव झाल्याबरोबर या क्षेत्रातून तंत्रज्ञांची वेगाने पिछेहाट होत आहे. मस्क यांच्या म्हणण्यांनुसार बदलाचा हा वेग एवढा आहे की, जवळपास वर्षभरात कोडिंगचे काम पूर्णपणे एआय टुल्सकडे जाणार आहे.

# दिल्लीनंतर पुणे! कॉकरोचचे आज आंदोलन त्यानंतर लरवनौ, जयपूर, बंगळुरू! देशभर आक्रोश

■ पुणे

**नीट** पेपरफुटी आणि सीबीएसई परीक्षेतील गैरप्रकार प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीत केलेल्या पहिल्या आंदोलनाला तरुणांचा फारसा प्रतिसाद न मिळूनही 'कॉकरोच जनता पार्टी' आता देशव्यापी आंदोलन करणार आहे. या आंदोलनाची सुरुवात उद्यापासून पुण्यातून होणार आहे. त्यानंतर लखनौ, अमृतसर, जयपूर आणि बंगळुरु या शहरांमध्ये आंदोलन केले जाईल आणि तरीही शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर २० जून रोजी दिल्लीत जंतरमंतरवर




पुन्हा आंदोलन केले जाईल. धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत मागे हटणार नाही, असे 'कॉकरोच पार्टी'चा संस्थापक अभिजीत दीपके याने आज सांगितले.

अभिजीत दीपके याने आज पुण्यात पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत कॉकरोच पार्टीच्या पुढच्या आंदोलनाची दिशा सांगताना तो म्हणाला की, देशातील शिक्षण व्यवस्थेचे अपयश आणि नीट परीक्षांमधील पेपरफुटीमुळे ६ ते ७ निष्पाप विद्यार्थ्यांना आपल्या प्राणांना मुकावे लागले आहे. विविध परीक्षांच्या पान ७ वर

# नीट-यूजी फेरपरीक्षेत पुन्हा चुका होणार नाहीत

### धर्मेंद्र प्रधान यांची ग्वाही

■ नवी दिल्ली

**नीट** फेरपरीक्षेत कोणत्याही त्रुटी राहू नयेत यासाठी केंद्र सरकारने सर्व आवश्यक उपाययोजना केल्या असून यापूर्वी झालेल्या चुका पुन्हा होणार नाहीत, अशी ग्वाही केंद्रीय शालेय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. ते म्हणाले की, २१ जून रोजी होणाऱ्या नीट-यूजी फेरपरीक्षेबाबत विद्यार्थ्यांनी कोणतीही चिंता मनात बाळगू नये. केवळ आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा केंद्रांपर्यंत त्या सुरक्षित पोहोचवण्यापर्यंत यावेळी विशेष खबरदारी घेतली जात आहे. सीईआरटी-इन, आयफोरसी, गुप्तचर विभाग, सीबीआय आणि गृह मंत्रालय यांसारख्या सर्व प्रमुख संस्था सायबर सुरक्षेवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत, नीट-यूजी फेरपरीक्षा देशातील ५५१ शहरांमध्ये ५ हजार ४३५ केंद्रांवर घेतली जाणार आहे. यामध्ये भारताबाहेरील १४ केंद्रांचाही समावेश आहे.



# स्मार्ट मीटर उत्पादक कंपनी अदानी रवरेदी करणार

■ नवी दिल्ली

**अदानी** एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडने देशातील आघाडीची स्मार्ट मीटरिंग कंपनी असलेल्या इंटेलीस्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडमधील १०० टक्के हिस्सा खरेदी करणार आहे. म्हणजेच कंपनी विकत घेतली आहे. यासंदर्भात तब्बल ३,०५० कोटी रुपयांचा खरेदी करार करण्यात आला आहे.

'इंटेलीस्मार्ट' ही कंपनी देशात स्मार्ट मीटर्सची स्थापना, देखरेख आणि संचालन करते. तिची स्थापना नोव्हेंबर २०१९ मध्ये झाली व गेल्या काही वर्षांत स्मार्ट मीटरिंग क्षेत्रात तिने वेगाने विस्तार केला आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कंपनीची उलाढाल ६२१.३ कोटी रुपये होती तर आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ती २४३.५ कोटी व आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ८५ कोटी रुपये होती. यावरून कंपनीची जलद वाढ दिसून येते. हे अधिग्रहण अदानी एनर्जी सोल्युशन्सच्या विकास धोरणाचा एक भाग मानले जाते. कंपनीचे म्हणणे आहे की, या करारामुळे स्मार्ट मीटरिंग क्षेत्रात तिचे स्थान अधिक मजबूत होईल. इंटेलीस्मार्टच्या समावेशामुळे अदानी एनर्जीचा स्थापित व करारबद्ध स्मार्ट मीटर पोर्टफोलिओ ४.७ कोटी मीटर्सपर्यंत वाढेल.अदानी एनर्जीने स्पष्ट केले आहे की, हे अधिग्रहण पूर्णपणे रोख व्यवहाराद्वारे केले जाईल. कंपनी इंटेलीस्मार्टचा १०० टक्के हिस्सा विकत घेईल व तिचे परिवर्तनीय डिबेंचर्स परत करेल.

# काँग्रेसच्या दुष्टचक्रातून देशाला मुक्त केले हे एनडीएच्या १२ वर्षांच्या सत्तेचे यश! मोदींचे प्रतिपादन

■ नवी दिल्ली

**काँग्रेसने** देशाला असहाय्यता, गरिबी आणि हिनतेच्या गर्तेत ढकलले होते. एनडीएच्या १२ वर्षांच्या सत्तेचे मोठे यश म्हणजे देशाला काँग्रेस पक्षाच्या तावडीतून मुक्त केले आहे, असे वक्तव्य आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सर्वाधिक काळ पंतप्रधानपदावर राहण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. आज त्यांच्या कार्यकाळाला ४,३९९ दिवस पूर्ण झाले



आहेत. यापूर्वी हा विक्रम देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नावावर होता. यानिमित्त आज दुपारी साडेबारा वाजता पान ७ वर

### पंतप्रधानपदाचा सन्मान, पण नेहरू हे नेहरूच होते! शरद पवारांचे विधान

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित कार्यक्रमात पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी मोदी आणि नेहरू यांच्या तुलनेवर टोकदार भाष्य केले. पंतप्रधानपद हे घटनात्मक पद आहे. त्याचा सन्मान आहेच. परंतु पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही. नेहरू हे नेहरूच होते, असे पवार म्हणाले. 'नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान आहेत. पंतप्रधानपद हे संसदीय लोकशाहीतील एक संस्थात्मक आणि घटनात्मक पद आहे. त्या पदाचा सन्मान पान ७ वर

# मेटा आणि रिलायन्स जामनगरमध्ये पहिले एआय डेटा सेंटर उभारणार

■ नवी दिल्ली

**मेटा** भारतात रिलायन्स इंडस्ट्रीजसोबत भागीदारीत आपले पहिले एआय-पॉवर्ड डेटा सेंटर गुजरातच्या जामनगरमध्ये उभारणार आहे. १६८ मेगावॉट क्षमतेचे डेटा सेंटर दोन वर्षांत कार्यान्वित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या भागीदारी अंतर्गत रिलायन्स जामनगरमधील डेटा सेंटर पूर्णपणे विकसित करेल. रिलायन्स या प्रकल्पासाठी डिझाइन, बांधकाम, युटिलिटी व्यवस्थापन, अक्षय्य ऊर्जा, नेटवर्क कनेक्टिव्हिटी सेवा प्रदान करेल.

रिलायन्स इंडस्ट्रीजचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी म्हणाले, मेटासोबतची ही भागीदारी भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांसाठी एक परिवर्तनकारी क्षण आहे. मेटाचे भारतातील पहिले बिल्ट-टू-सूट डेटा सेंटर तयार करणे हे दर्शवते की, भारत जागतिक एआय क्रांतीमध्ये आघाडीवर राहण्यास सज्ज आहे. जामनगर हायपरस्केल एआय कॉम्प्युटिंगसाठी एक महत्त्वाचे ठिकाण बनेल. मेटाचे संस्थापक आणि सीईओ मार्क झकरबर्ग म्हणाले, भारतात आमचे पहिले एआय-पॉवर्ड डेटा सेंटर तयार करण्यासाठी रिलायन्ससोबत काम करताना आम्हाला अभिमान वाटतो. जामनगरमधील ही जागतिक दर्जाची सुविधा आम्हाला जागतिक स्तरावर आमचे एआय इन्फ्रास्ट्रक्चर वाढवण्यास आणि भारताच्या पान ७ वर

# राम मंदिरातील देणगी घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी होण्याची शक्यता

**अयोध्येतील राम मंदिरात भाविकांकडून दिल्या जाणाऱ्या देणग्यांमध्ये अपहार झाल्याच्या आरोपावरून राजकारण तापले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याची गंभीर दखल घेतली असून याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी होण्याची शक्यता आहे.**

■ लरवनौ

**समाजवादी** पार्टीचे (सपा) अध्यक्ष अखिलेश यादव यांनी राम मंदिराच्या दानपेटीतील ५ ते ७ कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा आरोप केला



होता. त्यांच्या पाठोपाठ सपाच्या आणखी एका नेत्याने असाच आरोप करून न्यायालयाने याची सूमोटो दखल घ्यावी, अशी मागणी केली होती. हे प्रकरण पंतप्रधान कार्यालयापर्यंत पोहोचताच राम मंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष आणि पंतप्रधान मोदींचे माजी प्रधान सचिव नृपेंद्र मिश्रा सोमवारी अयोध्येत दाखल झाले. त्यांच्या अध्यक्षतेखाली बंद दाराआड समिती सदस्यांची बैठक झाली. त्यानंतर अशी जोरदार चर्चा आहे की, या प्रश्नी प्रशासनाकडून हस्तक्षेप केला जाईल. तसेच देणगीबाबतच्या प्रक्रियेचा संपूर्ण आढावा घेतला जाईल. राज्यात विरोधकांनी हा मुद्दा पूर्ण ताकदीने लावून धरला आहे. मंदिराला मिळालेल्या देणग्यांबाबत पारदर्शकता असलीच पाहिजे, असा विरोधकांचा आग्रह आहे.

# ममता बॅनर्जींना आणरवी एक धक्का रवा. सुष्मिता देव यांचाही राजीनामा

■ कोलकाता

**तृणमूल** काँग्रेसमधील अंतर्गत कलह अधिक तीव्र होत असून पक्षाच्या राज्यसभा खासदार सुष्मिता देव यांनी आज

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

आपल्या पदाचा राजीनामा दिला. यामुळे माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आणखी एक मोठा राजकीय धक्का दिला आहे. यापूर्वी पक्षाचे ज्येष्ठ नेते सुखेंदू शेखर रॉय यांनीही तीन दिवसांपूर्वी पक्ष सोडला होता. तर तृणमूलच्या २० हून अधिक खासदारांनी बंडाचा पवित्रा घेतला आहे.

सुष्मिता देव यांनी राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांना पत्र पाठवून आपला राजीनामा तत्काळ प्रभावाने स्वीकारण्याची विनंती केली आहे. मात्र, राजीनाम्यामागील नेमके कारण त्यांनी सार्वजनिकरित्या स्पष्ट केलेले नाही. तरीही त्यांच्या या निर्णयाचा संबंध पक्षातील वाढत्या अंतर्गत असंतोषाशी जोडला जात आहे. सुष्मिता देव यापूर्वी काँग्रेसमध्ये होत्या.

# ही निवडणूक धनदांडग्यांची शिंदेंच्या आमदाराचीच कबुली



■ नांदेड

**स्थानिक** स्वराज्य संस्थाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. याबाबत शिंदे गटाचे नांदेडचे आमदार हेमंत पाटील यांनी महायुतीलाच घरचा आहेर देत खळबळजनक वक्तव्य केले. ही निवडणूक मराठी माणसाची नाही तर धनदांडग्यांची झाली आहे, असा घणाघात त्यांनी करत निवडणुकीच्या अर्थकारणावर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

हेमंत पाटील म्हणाले की, कोळशाच्या दलालीत हात काळे करायचे नाही म्हणून मी मुद्दाम या निवडणुकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. ही निवडणूक आता मराठी माणसाची राहिलेली नसून धनदांडग्यांची झाली आहे. आपण कुणाला काही सांगितले तरी त्याने फरक पडणार नाही, कारण सर्वजण पैसे घेतल्याशिवाय मतदान करणार नाहीत, अशी परिस्थिती आहे. सध्या महाराष्ट्रातल्या राजकारणाचा पार तमाशा झाला आहे. ही एकप्रकारे अगतिकता असून महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. सध्या सगळीकडे मोठा बाजार सुरू झाला आहे. नांदेडमधील पारंपरिक राजकीय शत्रू असलेले अशोक चव्हाण व प्रतापराव चिखलीकर यांच्यातील दिलजमाईवर ते म्हणाले की, आजच्या घडीला कोणाबरोबर बसावे आणि कोणावर विश्वास ठेवावा, हेच मोठे प्रश्नचिन्ह आहे. आज जो माणूस आमच्यासोबत बसला आहे, तो उद्या कुणासोबत असेल हे कोणीही सांगू शकत नाही.




# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

पेशंटकेअरसाठी आया, बाई, पुरुष त्वरित पाहिजेत. संपर्क: **9321205984** {NC260803}

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी टेक्निशियन पाहिजेत पगार 18000/- कांदिवली पश्चिम: **9769723507** {NC260851}

गोरेगांवमध्ये इमिटेशन कामासाठी मुली पाहिजेत आकर्षक पगार संपर्क: **9769737444/ 8169195899** {NC260873}

वसई-मुंबई येथील मठासाठी अनुभवी आचारी पाहिजेत संपर्क: **9930607550** {NC260874}

इंटरनॅशनल शाळेमध्ये मीरारोडयेथे सफाई कर्मचारी बाई/पुरुष पाहिजेत: **8169862708/ 9004949778** {NC260879}

परेल येथे ऑफीससाठी फ्रेशर्स ऑफिस असिस्टंट आणि मार्केटिंगसाठी पाहिजेत. **9920053121** {NC260857}

बँक जॉबसाठी मुला, मुलींची भरती. पगार 18800/- ते 35000/- **8788968016** {NC260858}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार 12000 + गाडीभाडे+ कमिशन **8356824867** {NC260794}

मालाड- सराऑगी हॉस्पिटलमध्ये बाई आणि नर्स पाहिजेत. पगार अनुभवानुसार.- **9372179410/8169717250/ 8850941620** {NC260796}

सिक्युरिटी हाऊसकीपिंग कंपनीला- सेल्स/ मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, बाऊन्सर, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफीसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर हाऊसकीपिंग मुले/मुली पाहिजेत- **9223380568/69** {NC260798}

## पाहिजेत

**दादरयेथील दुकाना करिता सेल्समन पाहिजे. पगार 17000/- महिना. मालक- 9967297770 {NC260883}**

स्किन clinic साठी staff पाहिजे (Receptionist/ Nurse), Naupada, thane. संपर्क- **9137792915** {NC260881}

प्रिंटींग प्रेसमध्ये फिडरमॅन पाहिजे (भायखळा) - **9820080776/ 9819551478** {NC260882}

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/महिला पाहिजेत. **9987577655** {NC260871}

दादर दुकानासाठी जेन्ट्स हाऊसकिपिंग/ हेल्पर. पगार 650/- per day-. **9821016904** {NC260884}

ऑफिस कामांसाठी मुलीची आवश्यकता आहे. डोंबिवली वेस्ट संपर्क **8369864046** {NC260885}

## Situation Vacant

**A Chemical Factory at Vasai East- Urgently requires 1) Male Graduate (in any discipline) to manage & coordinate day-to-day factory activities 2) Helpers (12th studied). Salary negotiable for both post. Candidates can contact on mobile- 9321630032/ 9321630011. {NC260838}**

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260680}

## व्यसन मुक्ती

दारू सोडवा : दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, औषधे उपलब्ध. डॉ., नागरगोजे- **9765609769** {NC260716}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260552}

प्रोफेशनल सिव्हिल आर्किटेक्चर ड्राफ्टसमन आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमन कोर्सेस. शिवाय दहावी, बारावी टेक्निकल फेलसाठी टेक्निकल ड्रॉईंग आणि टेक्निकल डिप्लोमा फेलसाठी इंजिनियरिंग ड्रॉईंग. गुप्ते अकॅडमी, दादर. **7506465793/ 9757312624** चौकशी सकाळी 8.30 ते दुपारी 3.30 {NC260837}


## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# एसआरए प्रकल्पातील १५० विकासकांवर कारवाईची टांगती तलवार

■ मुंबई

**वर्षानुवर्षे** झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प रखडवून ठेवणाऱ्या अंदाजे १५० खासगी विकासकांवर एसआरए कार्यालयाने १३/२ अंतर्गत कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला आहे. अशा प्रकल्पांसाठी नवीन विकासकांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती एका अभियंत्याने दिली.

मुंबईसह उपनगराच्या काही झोपडपट्टीतून एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी विकासकांनी संबंधित रहिवाशांच्या माध्यमातून झोपू योजना कार्यान्वित केल्या होत्या. मात्र काही झोपडपट्ट्यातून विकासकांनी झोपड्या तोडून रहिवाशांना आठ ते दहा वर्षापासून बेघर करून ठेवले आहे.

# पांढरे पट्टे मारून सांस्कृतिक दहशतवाद पसरवणाऱ्यांची तोंडे काळी करणार

■ मुंबई

**घाटकोपर-विद्याविहार** परिसरातील रस्त्यांवर जैन धर्मगुरूंसाठी रंगवलेल्या पांढऱ्या पट्ट्यांवरून निर्माण झालेल्या वादाला आता राजकीय वळण लागले आहे. या

## संदिप देशपांडेंचा इशारा

प्रकरणावर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आक्रमक भूमिका घेतली. पांढरे पट्टे मारून सांस्कृतिक दहशतवाद पसरवणाऱ्यांची तोंडे काळी करण्यात येतील, असा सज्जड इशारा देशपांडे यांनी एक्सपोस्टमधून दिला आहे.

घाटकोपरमधील कैलास ॲव्हेन्यू सोसायटीत काही ठिकाणी पांढऱ्या रंगाचे पट्टे रंगवले होते. जैन धर्मगुरू अनवाणी चालत असल्याने उन्हामुळे तापलेल्या रस्त्यावरून चालताना त्यांना त्रास होऊ नये, यासाठी ही व्यवस्था करण्यात आल्याचा दावा जैन समाजातील काही सदस्यांनी केला होता. मात्र या प्रकारावर काही स्थानिक नागरिक व सोसायटीतील रहिवाशांनी आक्षेप घेतला. युट्यूबर प्रसाद वेदपाठकने या विषयावर प्रश्न उपस्थित करत संबंधित पट्टे कोणाची परवानगी न घेता रंगवल्याचा आरोप केला. सार्वजनिक जागेचा धार्मिक कारणांसाठी वापर करणे अयोग्य असल्याचे सांगत त्यांनी हे पट्टे हटवण्याची मागणी केली होती.

त्यानंतर हा मुद्दा सोशल

# मराठा भवनच्या जागेवरून वाद धनंजय मुंडेंवर कारवाईची मागणी

■ बीड

**परळी** येथे मराठा भवनासाठी सरकारच्या वतीने देण्यात आलेल्या जमिनीच्या मालकीवरून आता वाद निर्माण झाला आहे. परळीचे आमदार, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते १४ मे रोजी या जागेत मराठा भवनाचे भूमिपूजन झाले होते. प्रत्यक्षात ही जमीन श्री दत्त देवस्थान थोरले देवघर संस्थानच्या मालकीची असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच जमिनीचा बेकायदेशीरपणे ताबा घेतल्याप्रकरणी धनंजय मुंडे आणि अन्य संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

श्री दत्त देवस्थान थोरले देवघर संस्थानचे अध्यक्ष योगेश गोस्वामी यांनी आमदार धनंजय मुंडे यांच्यावर मराठा समाजाची दिशाभूल केल्याचा आरोप केला आहे. तसेच संस्थानच्या मालकीच्या जमिनीचा बेकायदेशीरपणे ताबा मराठा भवनासाठी देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी संस्थानच्या वतीने बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, संबंधित जमिनीची कागदपत्रेही सादर केली आहेत.

# काहीजण कष्ट न करताच पुढे जातात! मंत्री भुजबळांचा टोला

■ मुंबई

**राज्यसभेची** उमेदवारी हुकल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी आता उघडपणे समोर येऊ लागली आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या सूचक आणि टोलेबाज वक्तव्यांमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. गेल्या २६ वर्षांत काहीजण मेहनतीने पुढे आले, तर काहीजण कष्ट न करताच पुढे गेले, असा टोला लगावत भुजबळ यांनी पक्षातीलच काही नेत्यांवर निशाणा साधला. त्यांच्या या वक्तव्याचा नेमका रोख कुणाकडे आहे, याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत.

भुजबळ म्हणाले की, काहींना वाटते पक्षाने त्यांना काही दिले नाही, पण प्रत्येकाने काम करत राहिले पाहिजे. पदे मर्यादित असतात, मात्र पक्ष सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करत असतो. गेल्या २६ वर्षांत काहीजण मेहनतीने पुढे आले. राजकारणात सर्वजण मेहनत करतात, मात्र काहीजण कष्ट न करताही पुढे जातात. पक्षासाठी प्रत्येक कार्यकर्ता महत्त्वाचा असतो. घरात मतभेद झाले म्हणून आपण घर सोडत नाही, तर आपली मते मांडतो.

# रत्नागिरीत पुलाचा स्लॅब कोसळून सुपरवायझर ठार

■ रत्नागिरी



**तालुक्यातील** कुर्धे लिंगायतवाडी व खोताचीवाडी दरम्यान असलेल्या पुलाजवळच्या उभ्या लोखंडी पाईपमधील कचरा काढताना अचानक पुलाचा स्लॅब कोसळला. या दुर्घटनेत २६ वर्षीय तरुण सुपरवायझरचा जागीच मृत्यू झाला, तर दोन कामगार आणि चार ग्रामस्थ सुदैवाने बचावले. या दुर्घटनेतील मृत सुपरवायझरचे नाव अक्षय शिवाजी काटे (२६) असे आहे. लिंगायतवाडी, खोताचीवाडी, फडकेवाडी आदी परिसरातील शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांना पावसाळ्यामध्ये ये-जा करण्यासाठी लोखंडी साकव बांधण्यात आला होता, परंतु तो नादुरुस्त झाल्यामुळे गेली दोन वर्षे या मार्गावरील पावसाळ्यातील वाहतूक ठप्प झाली होती.

सोमवारी जोरदार पाऊस झाल्यामुळे नदीला पाणी आले होते. त्यामुळे भरपूर कचरा या पुलाच्या लोखंडी खांबांना अडकून राहिल्यामुळे पुलाला धोका निर्माण झाला होता. याची माहिती मिळाल्यानंतर सुपरवायझर अक्षय शिवाजी काटे व त्याचे दोन कामगार सकाळी कामाच्या ठिकाणी हजर झाले आणि पुलाच्या सेंट्रींगसाठी उभारण्यात आलेल्या लोखंडी पाईपना अडकलेला गाळ काढू लागले. अक्षय काटे अडकलेला गाळ काढत असताना लावण्यात आलेला लोखंडी पाईप सटकल्याने पुलाच्या एका भागाचा स्लॅब संपूर्णपणे काटे यांच्या अंगावर पडला. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# मुंबईत सुट्टीच्या दिवशी बांधकामे बंद ठेवा वरुण सरदेसाईंचे मुंबई पालिकेला पत्र

■ मुंबई

**मुंबईत** रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी सुरू असलेल्या बांधकाम कामांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. यासंदर्भात उबाठाचे आ. वरुण सरदेसाई यांनी मुंबई महानगरपालिकेला पत्र लिहून रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी खासगी बांधकाम कामांवर संपूर्ण बंदी घालण्याची मागणी पालिका प्रशासनाकडे केली.

वरुण सरदेसाई यांनी पत्रात लिहिले की, मुंबई हे कधीही न थांबणारे शहर असले तरी रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्या हेच दिवस मुंबईकरांना विश्रांती व कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी मिळतात. मात्र, सुट्टीच्या दिवशीही सुरू असलेल्या बांधकामांमुळे ध्वनीप्रदूषण, धूळ आणि कंपणांचा त्रास वाढत असून ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण आणि लहान मुलांच्या जीवनमानावर परिणाम होत आहे. मुंबईचा विकास महत्त्वाचा असला तरी नागरिकांना आठवड्यातील किमान एक दिवस शांततेत घालवण्याचा हक्क मिळायला हवा.

# उरीत स्फोट! महाराष्ट्राचे दोन सुपुत्र शहीद

पान १ वरून- हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही दोघांना वाचवता आले नाही. लष्कराच्या माहितीनुसार, कमलकोट लष्करी कॅम्पमध्ये शस्त्रास्त्रांची आणि लष्करी साहित्याची नियमित देवाणघेवाण सुरू असताना अचानक हँड ग्रेनेडचा स्फोट झाला. या स्फोटात दोन्ही जवान गंभीर जखमी झाले. घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून लष्कराकडून सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. या घटनेनंतर लष्कराने सर्व आवश्यक प्रशासकीय आणि कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असून शहीद जवानांचे पार्थिव लष्करी इतमामात त्यांच्या मूळ गावी पाठविण्याची तयारी केली.

# ज्यांनी आंदोलन करायला सांगितले त्यांनाच पंचनामे करायला सांगा

■ मुंबई

## कृषिमंत्र्यांकडून शेतकऱ्याची थट्टा

**राज्यातील** शेतकरी प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला असून कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. जळालेल्या उसाच्या पंचनाम्यासाठी मदत मागणाऱ्या शेतकऱ्याला दिलेल्या उत्तरामुळे संताप व्यक्त केला जात आहे. खडकवासला परिसरातील एका शेतकऱ्याचा ऊस जळून नुकसान झाले होते. पंचनामे करून तातडीने मदत मिळावी, या अपेक्षेने हा शेतकरी थेट मंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचला. यावेळी त्याने मामा, तुम्ही शब्द दिला होता' अशी आठवण करून दिली. मात्र, त्यावर उत्तर देताना दत्ता भरणे म्हणाले, मी कोणताही शब्द दिला नव्हता. तुम्ही मोठी माणसे आहात, मी साधा माणूस आहे. तुम्हाला ज्यांनी सांगितले, त्यांनाच पंचनामे करायला सांगा, असे सांगितले. या संपूर्ण घटनेचा व्हायरल झाला आहे.

शेतकऱ्याचे म्हणणे ऐकून न घेताच मंत्री दत्ता भरणे तिथून निघून गेल्याने संतापाची लाट उसळली आहे. अन्नदात्याची अशी थट्टा करणारे कृषिमंत्री काय कामाचे? असा सवाल करत नेटकऱ्यांनी मंत्र्यांवर टीकेची झोड उठवली आहे.

# शक्तीपीठ महामार्गाविरोधात विट्यात शेतकऱ्यांचा मोर्चा

■ सांगली

**शक्तीपीठ** महामार्ग प्रकल्पाच्या विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आज विटा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी आक्रोश मोर्चा काढत तीव्र निषेध नोंदविला. मोर्चेकऱ्यांनी तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. यावेळी राजू शेट्टी यांनी प्रशासनाला धारेवर धरत, पहाटे दोन वाजता सर्वेक्षण करण्याची गरज काय? असा सवाल प्रांताधिकाऱ्यांना केला.

प्रांताधिकारी विक्रमसिंह बादल, उपविभागीय अधिकारी विपुल पाटील आणि तहसीलदार योगेश टोणपे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. विटा परिसरातील भाग्यनगर, नागेवाडीसह अनेक गावांमध्ये शक्तीपीठ महामार्गासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याचा प्रयत्न गेल्या दोन दिवसांपासून सुरू आहे. या सर्वेक्षणासाठी पोलिसांचा बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. संबंधित गावांतील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केल्याने सर्वेक्षणाची प्रक्रिया थांबवावी लागली. काही ठिकाणी पोलीस आणि शेतकऱ्यांमध्ये शाब्दिक वाद तसेच झटापटीच्या घटनाही घडल्याचे सांगण्यात आले.

# डहाणू अत्याचार प्रकरणी तपास अधिकारी दिनेश आघाव निलंबित

■ डहाणू

**डहाणू** येथील दोन सख्ख्या बहिणींवरील कथित अत्याचार प्रकरणात तपास अधिकारी असलेले पोलीस उपनिरीक्षक दिनेश आघाव यांचे तत्काळ निलंबन करण्यात आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर न्यायालयाने कायदेशीर प्रक्रिया अपूर्ण असल्याच्या कारणावरून अटक अमान्य ठरवली होती. त्यानंतर आरोपी पुन्हा फरार झाल्याने परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

एकाच कुटुंबातील दोन सख्ख्या बहिणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप मुख्य आरोपीवर आहे. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर न्यायालयाने अटकेतील प्रक्रियात्मक त्रुटींवर आक्षेप घेत अटक अमान्य ठरवली. या प्रकरणाचा पुढील तपास विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणात पोक्सो कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. ११ जून २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | व्यावहारिक दृष्टीकोन उपयोगी राहील. नोकरीत सहकाऱ्यांशी वादाची शक्यता. तब्येत सांभाळा. |
| वृषभ | कार्यक्षेत्रात अचानक धावपळ करावी लागेल. नवीन ओळखीचा फायदा होईल. कामानिमित्त प्रवास घडू शकतो. |
| मिथुन | नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. नवीन गुंतवणूक करण्याचे योजाल. शुभवार्ता समजतील.. |
| कर्क | कार्यक्षेत्रात तुमच्या धाडसाचे कौतुक होईल. तुमचे महत्त्व वाढेल. नोकरीत आर्थिक लाभ होतील. |
| सिंह | ठरवलेल्या कामांमध्ये काही बदल होण्याची शक्यता राहील. आर्थिक व्यवहार जपून करावेत. धार्मिक स्थळांना भेटीचा योग. |
| कन्या | नोकरीमध्ये वरिष्ठांशी मतभेद टाळावेत. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. वाहने जपून चालवावीत. |
| तूळ | कामांमध्ये काही अडचणी आल्या तरी त्यावर मार्ग निघेल. खाण्याची पथ्ये पाळणे गरजेचे आहे. |
| वृश्चिक | व्यवसायात अचानक आव्हाने उभी राहतील. नोकरीत कामाचा ताण वाढेल. ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. |
| धनु | तुमच्या इच्छांना मुरड घालवी लागेल. मनासारखी कामे होणार नाहीत. प्रवासात तब्येत सांभाळा. |
| मकर | वास्तुसंबंधित कामांमध्ये अडचणी येऊ शकतात. नोकरीमध्ये व्यस्त राहाल. भावंडांचे सहकार्य चांगले राहील. |
| कुंभ | जुनी कामे मार्गी लागतील. व्यवहार मार्गी लागतील. वडिलधाऱ्यांचे सहाय्य लाभेल. प्रवास घडू शकतात. |
| मीन | नोकरी व्यवसायामध्ये कामाचा ताण जाणवेल.प्रवास फायदेशीर ठरतील. संततीबाबत चिंता दूर होतील. कुटुंबात धार्मिक वातावरण राहील. |

# शुभ राशी ता. ११/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| ५ | १ | ६ |
| ५२ | १३ | ६३ |
| ५७ | १८ | ६८ |
| १६८ | १३७ | १६९ |
| २६७ | ३८० | ३४९ |

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 23 • सोडत दिनांक 10/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AK-04 : 7863 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 7863 | चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक, श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4472 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1591 | 2128 | 2653 | 4373 | 5515 | 7283 | 7517 | 8598 | 9010 | 9234 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1229 | 1946 | 2698 | 4300 | 4796 | 5725 | 6022 | 7081 | 7273 | 8342 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0750 | 1025 | 1302 | 1389 | 1914 | 3989 | 4602 | 5852 | 6275 | 9308 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1038 | 1155 | 1575 | 4021 | 7164 | 7176 | 8374 | 8691 | 9074 | 9644 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1113 | 2056 | 2902 | 3539 | 4265 | 4946 | 5835 | 6521 | 7337 | 8229 | 8831 | 9481 |
| | | 1116 | 2073 | 2912 | 3544 | 4285 | 4985 | 5852 | 6529 | 7373 | 8231 | 8837 | 9509 |
| | | 1135 | 2102 | 2923 | 3548 | 4309 | 4987 | 5856 | 6548 | 7387 | 8232 | 8842 | 9521 |
| | | 1161 | 2137 | 2925 | 3562 | 4324 | 5014 | 5931 | 6566 | 7390 | 8238 | 8858 | 9523 |
| | | 1170 | 2221 | 2932 | 3580 | 4329 | 5023 | 5944 | 6624 | 7452 | 8260 | 8859 | 9565 |
| 0001 | 0405 | 1187 | 2224 | 2962 | 3602 | 4334 | 5037 | 5950 | 6638 | 7471 | 8270 | 8862 | 9567 |
| 0004 | 0416 | 1219 | 2232 | 3063 | 3635 | 4341 | 5040 | 5965 | 6654 | 7502 | 8271 | 8877 | 9609 |
| 0009 | 0450 | 1253 | 2234 | 3081 | 3649 | 4346 | 5151 | 5966 | 6661 | 7530 | 8276 | 8889 | 9639 |
| 0015 | 0477 | 1271 | 2237 | 3100 | 3666 | 4352 | 5194 | 6001 | 6671 | 7533 | 8283 | 8898 | 9646 |
| 0025 | 0525 | 1281 | 2239 | 3177 | 3678 | 4406 | 5201 | 6016 | 6692 | 7543 | 8305 | 8916 | 9647 |
| 0040 | 0529 | 1323 | 2259 | 3191 | 3681 | 4409 | 5225 | 6031 | 6695 | 7559 | 8326 | 8919 | 9652 |
| 0042 | 0534 | 1374 | 2274 | 3202 | 3717 | 4412 | 5227 | 6032 | 6708 | 7580 | 8328 | 8935 | 9687 |
| 0053 | 0550 | 1383 | 2285 | 3223 | 3725 | 4419 | 5256 | 6042 | 6714 | 7623 | 8337 | 8936 | 9689 |
| 0060 | 0574 | 1416 | 2293 | 3238 | 3733 | 4420 | 5266 | 6063 | 6763 | 7660 | 8347 | 8958 | 9708 |
| 0068 | 0650 | 1417 | 2295 | 3239 | 3734 | 4424 | 5275 | 6099 | 6781 | 7706 | 8358 | 8963 | 9718 |
| 0070 | 0687 | 1421 | 2297 | 3243 | 3739 | 4437 | 5335 | 6137 | 6788 | 7717 | 8381 | 8985 | 9719 |
| 0081 | 0690 | 1454 | 2299 | 3303 | 3743 | 4442 | 5342 | 6143 | 6803 | 7719 | 8432 | 8987 | 9759 |
| 0084 | 0697 | 1481 | 2329 | 3306 | 3783 | 4443 | 5362 | 6149 | 6807 | 7724 | 8478 | 9019 | 9764 |
| 0087 | 0732 | 1491 | 2424 | 3315 | 3796 | 4448 | 5375 | 6186 | 6863 | 7735 | 8484 | 9029 | 9767 |
| 0091 | 0750 | 1502 | 2453 | 3321 | 3812 | 4451 | 5387 | 6238 | 6867 | 7744 | 8491 | 9030 | 9774 |
| 0103 | 0793 | 1503 | 2462 | 3322 | 3824 | 4458 | 5419 | 6246 | 6873 | 7752 | 8538 | 9036 | 9775 |
| 0109 | 0858 | 1517 | 2482 | 3330 | 3840 | 4472 | 5448 | 6264 | 6912 | 7755 | 8542 | 9111 | 9787 |
| 0120 | 0861 | 1544 | 2548 | 3333 | 3854 | 4474 | 5497 | 6291 | 6924 | 7772 | 8589 | 9113 | 9839 |
| 0160 | 0870 | 1581 | 2570 | 3336 | 3871 | 4481 | 5507 | 6319 | 6938 | 7777 | 8608 | 9137 | 9864 |
| 0172 | 0885 | 1588 | 2594 | 3337 | 3931 | 4494 | 5509 | 6321 | 6955 | 7778 | 8612 | 9139 | 9884 |
| 0178 | 0894 | 1614 | 2608 | 3338 | 3936 | 4515 | 5528 | 6323 | 6958 | 7780 | 8617 | 9152 | 9888 |
| 0195 | 0906 | 1618 | 2657 | 3348 | 3996 | 4517 | 5544 | 6343 | 6983 | 7842 | 8637 | 9154 | 9889 |
| 0205 | 0948 | 1645 | 2660 | 3383 | 4032 | 4542 | 5553 | 6345 | 6985 | 7870 | 8639 | 9247 | 9911 |
| 0223 | 0976 | 1719 | 2720 | 3384 | 4034 | 4642 | 5570 | 6351 | 7005 | 7931 | 8680 | 9250 | 9916 |
| 0226 | 0991 | 1789 | 2722 | 3400 | 4045 | 4647 | 5575 | 6360 | 7007 | 7935 | 8702 | 9263 | 9931 |
| 0255 | 1001 | 1811 | 2724 | 3422 | 4048 | 4674 | 5604 | 6384 | 7017 | 7970 | 8738 | 9298 | 9933 |
| 0265 | 1019 | 1813 | 2739 | 3430 | 4051 | 4726 | 5619 | 6390 | 7047 | 7972 | 8780 | 9307 | 9934 |
| 0280 | 1065 | 1824 | 2782 | 3445 | 4054 | 4729 | 5646 | 6403 | 7075 | 8034 | 8784 | 9309 | 9951 |
| 0310 | 1081 | 1865 | 2787 | 3478 | 4057 | 4730 | 5658 | 6412 | 7077 | 8081 | 8785 | 9321 | 9960 |
| 0349 | 1082 | 1916 | 2792 | 3497 | 4092 | 4766 | 5660 | 6429 | 7127 | 8086 | 8805 | 9349 | 9962 |
| 0350 | 1083 | 1921 | 2798 | 3517 | 4142 | 4804 | 5668 | 6456 | 7139 | 8142 | 8810 | 9390 | 9981 |
| 0354 | 1085 | 1929 | 2802 | 3527 | 4184 | 4813 | 5671 | 6460 | 7174 | 8178 | 8814 | 9399 | 9985 |
| 0379 | 1103 | 1949 | 2809 | 3531 | 4234 | 4842 | 5680 | 6466 | 7210 | 8183 | 8822 | 9421 | 9989 |
| 0385 | 1104 | 1975 | 2847 | 3534 | 4258 | 4843 | 5698 | 6510 | 7217 | 8188 | 8823 | 9455 | 9996 |
| 0400 | 1111 | 2002 | 2868 | 3537 | 4260 | 4941 | 5825 | 6519 | 7276 | 8217 | 8826 | 9477 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 10/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-01 : 7353 | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3158 | श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3256 | महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0872 | 1930 | 2235 | 3035 | 4599 | 5026 | 6318 | 6345 | 6556 | 7263 |
| 500/- | 1185 | 1934 | 3118 | 4070 | 4711 | 5034 | 5185 | 6413 | 7544 | 9303 |
| 200/- | 0019 | 1439 | 1839 | 2295 | 4361 | 5401 | 5693 | 7935 | 8602 | 9228 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1524 | 2366 | 3339 | 4241 | 5118 | 6136 | 7151 | 8326 | 9338 |
| | | 1596 | 2382 | 3378 | 4284 | 5260 | 6145 | 7152 | 8503 | 9402 |
| | | 1615 | 2412 | 3431 | 4310 | 5304 | 6164 | 7261 | 8538 | 9494 |
| 0000 | 0571 | 1718 | 2426 | 3436 | 4333 | 5529 | 6220 | 7457 | 8628 | 9497 |
| 0001 | 0610 | 1831 | 2491 | 3455 | 4338 | 5530 | 6233 | 7582 | 8643 | 9518 |
| 0009 | 0700 | 1842 | 2532 | 3466 | 4463 | 5572 | 6265 | 7708 | 8730 | 9525 |
| 0012 | 0779 | 1861 | 2702 | 3514 | 4472 | 5604 | 6314 | 7716 | 8763 | 9547 |
| 0028 | 0822 | 1947 | 2722 | 3591 | 4534 | 5730 | 6346 | 7719 | 8801 | 9581 |
| 0066 | 0858 | 1949 | 2728 | 3753 | 4683 | 5731 | 6393 | 7740 | 8833 | 9653 |
| 0101 | 0908 | 2002 | 2741 | 3843 | 4704 | 5758 | 6394 | 7741 | 8878 | 9718 |
| 0139 | 1006 | 2009 | 2792 | 3934 | 4740 | 5781 | 6405 | 7748 | 8881 | 9728 |
| 0143 | 1043 | 2012 | 2896 | 3938 | 4747 | 5849 | 6556 | 7977 | 8931 | 9799 |
| 0161 | 1063 | 2151 | 2926 | 3947 | 4767 | 5954 | 6601 | 8014 | 8934 | 9869 |
| 0168 | 1069 | 2162 | 3037 | 3980 | 4785 | 6006 | 6612 | 8057 | 8983 | 9936 |
| 0230 | 1075 | 2175 | 3131 | 4009 | 4823 | 6023 | 6620 | 8084 | 8987 | 9937 |
| 0270 | 1140 | 2214 | 3148 | 4011 | 4928 | 6067 | 6771 | 8198 | 9116 | 9940 |
| 0338 | 1151 | 2219 | 3234 | 4042 | 4941 | 6076 | 6836 | 8217 | 9199 | 9946 |
| 0370 | 1176 | 2225 | 3243 | 4044 | 4943 | 6084 | 6885 | 8269 | 9222 | 9948 |
| 0430 | 1371 | 2252 | 3265 | 4123 | 5005 | 6096 | 6922 | 8280 | 9228 | 9969 |
| 0488 | 1386 | 2262 | 3271 | 4174 | 5053 | 6102 | 6969 | 8283 | 9268 | 9979 |
| 0529 | 1510 | 2270 | 3309 | 4177 | 5057 | 6117 | 6993 | 8284 | 9293 | 9990 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 10/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SV-07 : 9198 | श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0036 | 0442 | 0865 | 1094 | 1654 | 1893 | 1907 | 2305 | 2733 | 4690 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0637 | 1427 | 1558 | 2267 | 3125 | 3965 | 5560 | 6133 | 7395 | 7958 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0544 | 1010 | 3023 | 3868 | 5926 | 6166 | 9127 | 9267 | 9304 | 9695 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0917 | 1943 | 2922 | 3908 | 5495 | 6933 | 8078 | 8951 |
| | 0937 | 2073 | 3013 | 4071 | 5756 | 6966 | 8118 | 8986 |
| 0037 | 1028 | 2326 | 3032 | 4086 | 5776 | 7018 | 8173 | 9039 |
| 0199 | 1082 | 2372 | 3063 | 4195 | 5783 | 7221 | 8268 | 9369 |
| 0368 | 1115 | 2414 | 3134 | 4485 | 6203 | 7270 | 8348 | 9393 |
| 0502 | 1128 | 2425 | 3175 | 4552 | 6282 | 7348 | 8382 | 9455 |
| 0550 | 1271 | 2430 | 3381 | 4556 | 6354 | 7485 | 8430 | 9515 |
| 0670 | 1281 | 2522 | 3431 | 4896 | 6379 | 7627 | 8539 | 9631 |
| 0739 | 1310 | 2642 | 3451 | 5082 | 6560 | 7649 | 8548 | 9735 |
| 0799 | 1456 | 2722 | 3552 | 5257 | 6655 | 7720 | 8549 | 9905 |
| 0804 | 1550 | 2753 | 3679 | 5262 | 6726 | 7780 | 8738 | 9909 |
| 0834 | 1618 | 2831 | 3722 | 5415 | 6758 | 7877 | 8765 | 9954 |
| 0908 | 1719 | 2832 | 3880 | 5478 | 6826 | 7922 | 8803 | 9968 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 10/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-00 : 4132 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0186 | 0880 | 0968 | 1250 | 2987 | 5289 | 5576 | 6037 | 7010 | 7155 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0039 | 1436 | 3085 | 4051 | 4158 | 4343 | 4621 | 8619 | 8763 | 9781 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0419 | 2141 | 2299 | 3113 | 3594 | 4767 | 4922 | 6442 | 9319 | 9887 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0521 | 2619 | 3337 | 4103 | 5762 | 5975 | 6147 | 7375 | 7902 | 8033 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 100/- | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1638 | 2378 | 3197 | 3762 | 4922 | 5546 | 6649 | 7472 | 8196 | 9077 |
| | | 1659 | 2388 | 3212 | 3803 | 4945 | 5563 | 6696 | 7573 | 8208 | 9079 |
| 0000 | 0801 | 1661 | 2423 | 3214 | 3907 | 4956 | 5585 | 6720 | 7617 | 8235 | 9104 |
| 0010 | 0809 | 1673 | 2445 | 3253 | 3948 | 4962 | 5613 | 6763 | 7722 | 8238 | 9157 |
| 0030 | 0858 | 1712 | 2505 | 3357 | 4045 | 5061 | 5652 | 6764 | 7727 | 8281 | 9169 |
| 0056 | 1079 | 1721 | 2509 | 3359 | 4169 | 5109 | 5655 | 6808 | 7751 | 8286 | 9175 |
| 0137 | 1109 | 1740 | 2526 | 3375 | 4188 | 5115 | 5764 | 6836 | 7755 | 8333 | 9196 |
| 0140 | 1119 | 1771 | 2636 | 3383 | 4285 | 5160 | 5870 | 6845 | 7783 | 8381 | 9221 |
| 0204 | 1125 | 1805 | 2646 | 3402 | 4312 | 5205 | 5994 | 6858 | 7790 | 8399 | 9266 |
| 0242 | 1146 | 1861 | 2736 | 3503 | 4444 | 5235 | 6039 | 6953 | 7813 | 8442 | 9283 |
| 0284 | 1151 | 1895 | 2753 | 3513 | 4469 | 5295 | 6093 | 7067 | 7846 | 8514 | 9313 |
| 0287 | 1162 | 1978 | 2846 | 3539 | 4487 | 5315 | 6113 | 7085 | 7871 | 8689 | 9354 |
| 0301 | 1277 | 2029 | 2850 | 3571 | 4536 | 5350 | 6164 | 7092 | 7880 | 8736 | 9398 |
| 0448 | 1314 | 2053 | 2977 | 3576 | 4540 | 5359 | 6173 | 7170 | 8038 | 8767 | 9399 |
| 0490 | 1351 | 2079 | 3036 | 3590 | 4584 | 5377 | 6253 | 7179 | 8070 | 8785 | 9405 |
| 0496 | 1357 | 2105 | 3043 | 3644 | 4614 | 5384 | 6256 | 7211 | 8078 | 8799 | 9514 |
| 0568 | 1381 | 2115 | 3045 | 3675 | 4679 | 5406 | 6266 | 7255 | 8149 | 8826 | 9606 |
| 0606 | 1415 | 2120 | 3062 | 3709 | 4836 | 5414 | 6301 | 7297 | 8156 | 8829 | 9661 |
| 0660 | 1424 | 2206 | 3099 | 3727 | 4861 | 5433 | 6339 | 7327 | 8165 | 8873 | 9685 |
| 0663 | 1461 | 2230 | 3103 | 3732 | 4889 | 5472 | 6387 | 7366 | 8168 | 8876 | 9745 |
| 0740 | 1511 | 2260 | 3133 | 3738 | 4891 | 5508 | 6568 | 7373 | 8188 | 8982 | 9747 |
| 0800 | 1618 | 2262 | 3193 | 3760 | 4896 | 5525 | 6618 | 7413 | 8190 | 9028 | 9910 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# मोबाईलरूपी काळ आला होता पण वेळ आली नव्हती...

**त्याचे असे झाले, २ जून २०२६ माझा वाढदिवस. संध्याकाळ झाली होती, फोन चालू होते आणि प्रत्यक्ष मित्रमंडळी भेटायला येत होती. रात्री आम्ही सगळे जेवायला बसणार इतक्यात फोन वाजला, हॉस्पिटलमधून हाउसमन बोलत होती, पाच वर्षाची मुलगी अन्ननलिकेत दहा रुपयाचे मोठे नाणे अडकल्यामुळे आली होती, एक्सरे काढून पाठवला होता.**

एक्सरे बघताच मी चमकलो, एक मोठे नाणे घशाच्या खाली अडकून बसले होते, अशा ठिकाणी अडकले होते की खाली जाऊ शकत नव्हते आणि वरदेखील येत नव्हते, घशामध्ये जिथे अन्ननलिका आणि श्वासनलिका सुरू होतात, त्याच्या खाली दिसत होते. पडजीभ जिथे श्वासनलिका बंद करते, तिथून ते नाणे खाली घसरले आणि आत गेले, आतमध्ये गेले तरी खाली जठरात जाऊ शकत नव्हते कारण त्याचा मोठा आकार, वर येऊ शकत नव्हते कारण तिथे ऐच्छिक स्नायूंची एक झडप तयार झाली असते.

ती मुलगी सारखी उलटी काढायचा प्रयत्न करत होती. श्वास चालू होता, पण मुलगी खूप अस्वस्थ होती. साधी लाळदेखील तिला गिळता येत नव्हती. तातडीने भूलतज्ज्ञ माधुरी लिमये यांना बोलावले. समोरचे जेवण सोडून आम्ही (मी आणि स्वाती) गडबडीत निघालो.

रात्री दत्तकाशी हॉस्पिटलमधील ती इंडोस्कोपी रुम पाच सहा डॉक्टर आणि इतर स्टाफने भरून गेली होती. थोडी भूल देऊन नाणे काढणे शक्य नव्हते कारण ते अत्यंत धोक्याचे होते. श्वास नलिकेच्या तोंडावर अडकून बसले, तर सगळाच खेळ खलास. संपूर्ण भूल दिली, कृत्रिम श्वासासाठी ट्यूब श्वास नलिकेमध्ये टाकली. डॉ. तेजस भोसले समोर माउथ पीस घेऊन उभा होता आणि मी माझ्या हातातील इंडोस्कोप सावकाश घशामध्ये आत घालायला सुरुवात केली. घशापासून खाली काही अंतरावर चांगले लखलखीत डॉलरसारखे ते नाणे, त्याक्षणी मला यमरुपी काळ वाटत होते.

डॉ. संकेत प्रभुणे माझ्याशेजारी, त्याच्या हातात नाणे पकडण्याचा खास बनवलेला फॉरसेप्स, अट एकच, पकडलेले नाणे मध्येच सोडायचे नाही. संकेतने नाणे पकडले व लगेच डॉ. स्वातीने स्कोलीन नावाचे स्नायू शिथिल करण्याचे इंजेक्शन दिले. अगदी सावकाश आम्ही ते नाणे एकदाचे बाहेर काढले आणि हुश्श केले. मुलीची भूल उतरली आणि मग आम्ही तिला आयसीयू मध्ये शिफ्ट केले.



आता इथून पुढे अंतर्मुख करणारा मुद्दा. ती मुलगी मोबाईल बघत बसली होती. पाच वर्षाची ती चिमुरडी, कार्टून बघत असेल, शेजारी आईने एका वाटीत ठेवलेले कुरकुरे आणि वेफर्स खात होती. दुसऱ्या हातात तिच्या एक दहा रुपयाचे नाणे होते. बहुदा शेजारच्या दुकानातील वेफर्स आणण्यासाठी पैसे दिले आणि त्यातील शिल्लक नाणे असणार. मोबाईल मध्ये इतकी गुंगून गेली की तिने वेफर्स ऐवजी नाणे तोंडात टाकले आणि पुढील रामायण घडले!

**डॉ. संदीप गजानन श्रोत्री, सातारा**



मला आणि माझ्या दत्ताकाशी टीमला माझ्या वाढदिवशी एका लहानगीला पुनर्जन्म देण्याचे पुण्य लाभले. वेफर्सचा घास समजुनी, हाताने नाणे उचलले, स्क्रीनच्या त्या मोहजाळात भान सारेच हरपले.

क्षणभराचा तो प्रमाद, जीवघेणा ठरला होता, घशामध्ये अडकून नाणे श्वासच जणू थांबला होता धावपळ मग, चिंता, घाई, कुटुंब सारे घाबरले, वैद्यकशास्त्राच्या हाती जीवन पुन्हा सावरले. इंडोस्कोपीच्या कौशल्याने नाणे बाहेर आले, मृत्यूच्या त्या दारातूनही पाऊल मागे वळले. घटना ही सांगून जाते, सावध राहा प्रत्येक क्षणी, मोबाईलचा अति मोह हरवू नये भान ठेवा.मोबाईलपेक्षा मौल्यवान जीवन आहे हे जाणा, क्षणभराच्या दुर्लक्षाने ओढवू नये संकट महान.

# १९३ एकर वनजमिनीसाठी ठाणेकरांची स्वाक्षरी मोहीम

■ ठाणे

**शहरातील** चितळसर-मानपाडा (टिकुजीनीवाडी) येथील १९३ एकर वनक्षेत्र आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग वाचवण्यासाठी ठाणेकरांनी ऑनलाइन स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत गेल्या चार दिवसांत ११ हजार नागरिकांनी आपला पाठिंबा नोंदवला आहे.

या जागेच्या टीडीआर वाटपावरून राजकीय व न्यायालयीन वाद सुरू असून पर्यावरणप्रेमी जंगलाचे रक्षण करण्यासाठी आता या ऑनलाइन मोहिमेतील स्वाक्षरीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले जाणार आहे. ठाण्यातील पर्यावरणप्रेमींनी चितळसर-मानपाडा

## मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार

येथील जागेचे जंगल नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी Change.org वर जनहित याचिका व ऑनलाइन स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेला नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. या मोहिमेद्वारे



सबंधित १९३ एकर वनजमिनीशी संबंधित सर्व निर्णय, करार आणि प्रशासकीय हालचालीची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. या परिसरात झालेल्या कारवायांची स्वतंत्र चौकशी, संपूर्ण वनक्षेत्राचे वैज्ञानिक आणि पर्यावरणीय मूल्यमापन तसेच कोणत्याही प्रकारचा वननाश रोखण्यासाठी तातडीने संरक्षणात्मक उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अंबाबाईच्या मंदिरावर दीड किलो सोन्याचा कळस बसवण्यात येणार

■ कोल्हापूर

**करवीर** निवासिनी श्री अंबाबाई मंदिरावर लवकरच सोन्याचा कळस बसवण्यात येणार आहे. गोव्यातील एका भक्ताने दीड किलो सोन्याचा पत्रा वापरून डेऱ्यासह साडेतेरा फूट उंचीचा कळस तयार करून अर्पण केला आहे. अधिक मास संपण्यापूर्वी येत्या शुक्रवारी हा कळस मंदिरावर बसवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सदर भक्ताने यापूर्वीही अंबाबाई देवीला सोन्याचा अलंकार देणगी म्हणून अर्पण केला होता. आता त्याच भक्ताने मंदिराच्या शिखरासाठी दीड किलो सोन्याचा कळस देण्याचा संकल्प पूर्ण केला आहे. हा कळस आणि डेरा कर्नाटकमधील मंगळूरू येथील कारागिरांनी तयार केला आहे. कळसाच्या निर्मितीपूर्वी तांब्याचे मॉडेल तयार करण्यात आले. हे मॉडेल मंदिराच्या मूळ कळसावर बसवून अचूक मोजमाप घेण्यात आले. यासाठी सुमारे २०० किलो तांबे वापरण्यात आले असून त्यावर दीड किलो सोन्याचा पत्रा चढवण्यात आला आहे.

# अंधेरीत भटक्या कुत्र्याला मारले अभिनेत्री मंजिरी फडणीस आक्रमक

■ मुंबई

**अभिनेत्री** मंजिरी फडणीस यांनी त्यांच्या सोसायटीत राहणाऱ्या मायकी या भटक्या कुत्र्याला ठार मारण्यात आल्याने दुःख आणि संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणाची माहिती देताना त्यांनी एक व्हिडिओ शेअर केला असून, संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मंजिरी फडणीस यांनी सांगितले की, मायकी हा लांब केसांचा भटका कुत्रा होता. त्याच्या कुटुंबाने त्याला सोडून दिल्यानंतर तो २०१९-२० पासून त्यांच्या सोसायटीत राहत होता. मंजिरी आणि सोसायटीतील अनेक रहिवासी गेल्या सात वर्षांपासून त्याची काळजी घेत होते. काही दिवसांपूर्वी मायकी अचानक बेपत्ता झाल्यानंतर रहिवाशांनी त्याचा शोध सुरू केला. त्यासाठी परिसरात पोस्टर लावण्यात आले.

# लासलगावच्या १२ कांदा खरेदी केंद्रावर नाफेडची कारवाई

**नाशिक- राज्यातील** प्रमुख कांदा बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत नाफेडने मोठी कारवाई करत १२ कांदा खरेदीदार संस्थांचे परवाने स्थगित केले आहेत. आवश्यक बँक गॅरंटी सादर न केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. लासलगाव बाजार समितीत कांदा खरेदीसाठी एकूण १८ संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी १२ संस्थांनी आवश्यक बँक गॅरंटी जमा न केल्याने नाफेडने त्यांच्या परवान्यांवर तात्पुरती स्थगिती आणण्याचा निर्णय घेतला.

# पुणे शहरात १५ जूनपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा

## महापौर बैठकीत निर्णय

■ पुणे



**खडकवासला** धरण प्रकल्पातील पाणीसाठा वेगाने कमी होत असल्याने पुणे महापालिकेने १५ जूनपासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. खडकवासला धरणातील घटता साठा, कमी पावसाचा अंदाज आणि पुढील तीन महिन्यांच्या पाणी नियोजनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार नागरिकांसाठी काही निर्बंध जारी केले आहेत.

त्यामध्ये कोणत्याही बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरु नये; त्याऐवजी एसटीपीचे पाणी अथवा बोअरवेलचे, विहिरीचे पाणी वापरण्यात यावे, घरातील सर्व नळ तसेच सार्वजनिक स्वच्छतागृह येथील नळ कनेक्शन, फ्लश टाक्या व पाइपलाइनमधील गळती तात्काळ तपासून ती दुरुस्त करावी. शासकीय तसेच पालिका इमारतींमधील नळजोड, वॉशरूम, फ्लश टँन्क तपासून गळती बंद करावी, सार्वजनिक तसेच खाजगी वॉशिंग सेंटर बंद करावेत. वाहने धुणे, अंगण किंवा पदपथ स्वच्छ करणे यासाठी बोअरिंग अथवा पालिकेच्या पाण्याचा वापर करू नये, तसेच खाजगी व पालिका उद्यानांकरिता पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये.

# ठाणे नवजात अर्भकाचा मृत्यू शिकाऊ डॉक्टर निलंबित

■ ठाणे

**ठाणे** येथील सिव्हिल रुग्णालयात नवजात अर्भकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. शिकाऊ डॉक्टरांच्या कथित हलगर्जीपणामुळेच आपल्या बाळाचा जीव गेल्याचा आरोप माता-पित्यांनी केला असून, या प्रकरणी शिकाऊ डॉक्टर जिशान अन्सारी याला निलंबित करण्यात आले आहे.

मुलुंड येथील रतनभाई कंपाऊंड परिसरात राहणाऱ्या सरस्वती इंगळे यांना ६ जून रोजी सायंकाळी पाच वाजता प्रसूतीसाठी ठाणे सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांनी एका बाळाला जन्म दिला. उपचार सुरू असतानाच काल सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास नवजात अर्भकाचा मृत्यू झाला.या घटनेनंतर बाळाचे वडील अविनाश इंगळे यांनी संबंधित शिकाऊ डॉक्टरविरोधात आरोग्य विभागाकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर डॉक्टर जिशान अन्सारी याला निलंबित करण्यात आले.

# विदर्भातील शाळांच्या तारखेत पुन्हा बदल! आता ३० जूनला सुरू होणार



■ नागपूर

**विदर्भातील** शाळा सुरू करण्याबाबत शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयात अवघ्या २४ तासांत पुन्हा बदल करण्यात आला आहे. १५ जूनऐवजी २२ जूनपासून शाळा सुरू करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. पण आता हा आदेश रद्द करण्यात आला असून विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू होणार आहेत.

शाळा सुरू करण्याच्या निर्णयाविरोधात नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. या प्रकरणावरील सुनावणीत न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. २२ जूनपासून शाळा सुरू करण्याचा निर्णय योग्य नसल्याचे नमूद करत न्यायालयाने शिक्षण विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आज झालेल्या सुनावणीत नागपूर खंडपीठाने शिक्षण संचालकांनी काढलेल्या आदेशावर ताशेरे ओढले. नागपूर खंडपीठ आणि सर्वोच्च न्यायालयाचा आदेश अस्तित्वात असताना अशा प्रकारचा आदेश का काढण्यात आला, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला. राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांमध्ये शाळा नियोजित वेळापत्रकानुसार १५ जूनपासून सुरू होणार आहेत. मात्र विदर्भातील तीव्र उष्णतेची परिस्थिती लक्षात घेऊन तेथील शाळा सुरू होण्याची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. यापूर्वी शिक्षण विभागाने विदर्भातील शाळा २२ जूनपासून सुरू करण्याचे तसेच २२ ते ३० जूनदरम्यान सकाळच्या सत्रात वर्ग घेण्याचे आदेश जारी केले होते. शिक्षण संचालकांनी काढलेले हे आदेशपत्र आता रद्द करण्यात आले आहे.

# गोरेगावात रस्त्यावरून वीज खांब गायब! नगरसेविका सातम संतप्त

■ मुंबई

**गोरेगाव** पूर्व येथील गोकुळधाम परिसरातील रस्त्यावरून एक वीज खांब अचानक गायब झाल्याची बाब उघडकीस आल्यानंतर भाजपा नगरसेविका प्रीती सातम यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणावरून त्यांनी पालिका आणि वीजवितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत तातडीने नवीन वीज खांब उभारण्याचे निर्देश दिले आहेत.

गोकुळधाम परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांदरम्यान हा महत्त्वाचा वीज खांब हटविण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्याऐवजी नवीन खांब उभारण्यात आलेला नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. प्रीती सातम यांनी सांगितले की, वीज खांब नसल्याने संपूर्ण परिसर अंधारात राहण्याची शक्यता असून, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.

याबाबत त्यांनी पालिका प्रशासन तसेच वीजवितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे नाराजी व्यक्त करत संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून तातडीने नवीन वीज खांब बसवावा, अशी मागणी केली.

# अकोल्याच्या शहीद जवानाला मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान

## अखेरच्या श्वासापर्यंत दहशतवाद्यांशी लढा

■ नवी दिल्ली

**जम्मू-काश्मीरमधील** कुलगाम येथे दहशतवाद्यांशी लढताना सर्वोच्च बलिदान देणारे महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील सुपुत्र शहीद जवान प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान करण्यात आले. ते लष्कराच्या महार रेजिमेंटच्या पहिल्या बटालियन राष्ट्रीय रायफल्सचे शिपाई होते.

राष्ट्रपती भवनात आयोजित एका अत्यंत भावुक अशा विशेष 'रक्षा अलंकरण' सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या



हस्ते शहीद जवानाच्या आई शालूबाई जंजाळ आणि पत्नी श्यामबाला जंजाळ यांनी हा सन्मान स्वीकारला. आपल्या लेकाचे कीर्ती चक्र स्वीकारताना आईच्या अश्रूंचा बांध फुटला होता, त्यावेळी राष्ट्रपती मुर्मू यांनी त्यांचे सांत्वन करत धीर दिला. डोक्यात गोळी लागून गंभीर जखमी झाल्यानंतरही शहीद प्रवीण जंजाळ यांनी अखेरच्या श्वासापर्यंत दहशतवाद्यांशी लढा दिला होता. त्यांच्या याच साहसासाठी आणि सर्वोच्च बलिदानासाठी त्यांना देशाचा शांतता काळातील दुसरा सर्वोच्च शौर्य पुरस्कार 'कीर्ती चक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.

# रस्त्यातील झाडांच्या फांद्यांमुळे ऐनी गावची एसटी अचानक बंद

**कोल्हापूर-** राधानगरी तालुक्यातील ऐनी-पंडेवाडी मार्गावरील झाडांच्या रस्त्यावर आलेल्या फांद्यांमुळे ऐनी गावाला येणारी एसटी अचानक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. ही एसटी तातडीने पूर्ववत सुरू करावी, अन्यथा येत्या १६ जूननंतर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. अचानक एसटी बंद केल्याने अनेकांना दररोज ८ ते १० किलोमीटर पायपीट करून प्रवास करावा लागत आहे. या समस्येबाबत ऐनी ग्रामपंचायतीने राधानगरी आगार व्यवस्थापक यांना एसटी सेवा तत्काळ पूर्ववत सुरू करण्याबाबत तर सार्वजनिक बांधकाम विभागाला वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या झाडाच्या फांद्या हटवण्याबाबत निवेदन दिले आहे.

# कातकरी समाजातील सपना वाघमारे लंडनमध्ये एलएलएम शिक्षणासाठी पात्र

## मंत्री आदिती तटकरेंकडून सत्कार

■ मुंबई

**दुर्गम** आणि वंचित भागातील मुलींनी उच्च शिक्षणासाठी कातकरी समाजातील सपना चंद्रभागा राजेश वाघमारे हिच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आणि समाजातील रूढ परंपरांना छेद देत सपना हिने लंडनमधील विद्यापीठात एलएलएम (मास्टर ऑफ लॉ) शिक्षणासाठी पात्रता प्राप्त केली असून, तिच्या उच्च शिक्षणासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाहीही मंत्री तटकरे यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात



सपना वाघमारे हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना मंत्री तटकरे म्हणाल्या की, महिलांना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि शिक्षणाची समान संधी हे मूलभूत हक्क संविधानाने बहाल केले आहेत. प्रत्येक क्षेत्रात आज महिला आघाडीवर असल्या तरीही दुर्गम भागातील अनेक कुटुंबांना ऊसतोडणी किंवा कोळसा प्रकल्पांमध्ये कामासाठी सतत स्थलांतर करावे लागत असल्याने मुलींचे शिक्षण अनेकदा अपूर्ण राहते.

रायगड जिल्ह्यातील कातकरी समाजातील सपना वाघमारे हिने समाजातील अल्पवयीन विवाहाच्या प्रथेला नकार देत शिक्षणाचा मार्ग स्वीकारला. कायद्याचे शिक्षण घेऊन समाजातील महिलांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार तिने केला आहे.

# सांगोल्यात भीषण अपघात मायलेकाचा जागीच मृत्यू

**सांगली-** हैदराबादहून आपल्या मूळ गावी परतत असताना सांगोला तालुक्यातील आंधळगाव येथे राष्ट्रीय महामार्गावर एका भरधाव कारला जेसीबीने धडक दिली. या भीषण अपघातात मायलेकाचा जागीच मृत्यू झाला, तर तिघेजण गंभीर जखमी झाले. या अपघातातील मृत मायलेकाची नावे सूरज अशोक पाटील (३३) व शारदा अशोक पाटील (६०) अशी आहेत. ते वाळवा तालुक्यातील शेणे गावचे रहिवासी होते. सूरज पाटील हे व्यवसायाने इलेक्ट्रिकल इंजिनिअर व शासकीय कंत्राटदार होते. त्यांचे भाऊ विशाल पाटील हे हैदराबाद येथे नोकरीस आहेत. त्यांना भेटण्यासाठी सूरज पाटील, त्यांचे वडील अशोक पाटील, आई शारदा, पत्नी नीता आणि पुतण्या आयुष असे पाच जण कारमधून हैदराबादला गेले होते. सोमवारी हे सर्वजण हैदराबादहून गावी परतत होते. सूरज कार चालवत होते, तर वडील अशोक पाटील त्यांच्या शेजारील सीटवर बसले होते. आई शारदा, पत्नी नीता व पुतण्या आयुष हे मागील सीटवर बसले होते.

# भाईंदरमध्ये पाणीटंचाई विरोधात शिंदेसेनेचे टमरेल आंदोलन

■ भाईंदर

**मिरा-भाईंदर** शहरातील पाणी टंचाईविरोधात शिंदेंच्या शिवसेनेने पालिका मुख्यालयावर मोर्चा काढून टमरेल आंदोलन केले.

मिरा-भाईंदर शहराची लोकसंख्या वाढली आहे. पाण्याची मागणी आणि पुरवठा यात ५० दशलक्ष लीटर पाण्याची तफावत निर्माण झाली आहे. परिणामी नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. अनेक प्रभागांमध्ये ३ ते ४ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. पाणी आलेच तर ते अत्यंत कमी दाबाने व अनियमित वेळेत येते. या पाणीटंचाईच्या निषेधार्थ शिवसेनेच्या




वतीने पालिका मुख्यालयावर टमरेल मोर्चा काढून आंदोलन करण्यात आले होते. आंदोलकांना महानगरपालिकेत प्रवेश नाकारल्यानंतर शिवसैनिकांनी मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेरच ठिय्या आंदोलन केले. पाणीवाटपाचे पारदर्शक वेळापत्रक सादर करावे, अनधिकृत नळजोडण्या आणि पाणी चोरांवर कारवाई करावी, टंचाईग्रस्त भागात पालिकेने टँकरने पाणीपुरवठा करावा, पाणी गळती रोखावी, सर्वांना समान पाणी वाटप करावे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. या आंदोलनात मोठ्या संख्येने शिवसैनिक तसेच शहरातील महिला सहभागी झाल्या होत्या. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रवेशद्वारावर मोठ्या प्रमाणात सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

# भुजबळांच्या शासकीय निवासस्थानाचा गैरवापर! युवक पोलिसांच्या ताब्यात

■ मुंबई

**मंत्री** छगन भुजबळ यांच्या जेतवन या शासकीय निवासस्थानाच्या नावाचा आणि पत्त्याचा गैरवापर केल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती भुजबळ यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे. या प्रकरणात मलबार हिल पोलिसांनी बंगल्यावर धोबी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या मुलाला ताब्यात घेतले आहे.

गिरगाव परिसरातील एका पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीत भूखंड मालकांना मंत्र्यांच्या आवारातील पत्त्यावर भेटण्यासाठी बोलावण्यात आले. जाहिरातीत सातपुडा बंगल्याच्या खोली क्रमांक ४० मध्ये येऊन भेटण्याचे आवाहन करण्यात आले होते. यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करत राज्यपालांनी यामध्ये लक्ष घालावे, अशी मागणी केली होती.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लहान मुलांचा खेळ हा अधिकार व्हावा

जगभरातला कुठलाही देश असो, कुठलाही समाज असो, प्रत्येकाच्या जीवन जगण्याच्या गरजा सारख्याच स्वरूपाच्या असतात आणि आताच्या आधुनिक जगात प्रत्येक देशाला आपल्या समाजाचे जनजीवन हे अधिक प्रगत आणि उन्नत असावे असे वाटत राहाते. त्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानाचा उपयोग करून जीवनमानाचा स्तर अनेक पद्धतीने उंचावण्याचाही प्रयत्न होतो. विकसित देशांची विकासाची व्याख्या केवळ अर्थकारणापुरती मर्यादित राहात नाही. विज्ञान तंत्रज्ञानाच्या मदतीने सगळे देश वेगाने प्रगती करत आहेत. औद्योगिक दृष्ट्या किंवा एकूणच आपापल्या देशातील अर्थकारण मजबूत करण्यासाठी पायाभूत सुविधांचे प्रचंड जाळे निर्माण केले जाते. मग अगदी उत्तम दर्जाच्या रस्त्यांपासून ते अत्याधुनिक विमानतळांपर्यंत अशा एक ना अनेक घटकांचा त्यात समावेश होतो. परंतु केवळ या पायाभूत सुविधांमधून जीवनमानाचा स्तर उंचावतोच असे नाही. जीवन जगण्याच्या अन्य काही प्रेरणा आहेत की ज्या व्यक्तीच्या जन्मापासून ते त्याच्या अखेरीपर्यंत त्या महत्त्वाच्या वाटतात. वैयक्तिक स्तरावर घडून येणारा व्यक्तीमत्त्व विकास हा सामाजिक किंवा देशाच्यादृष्टीने सामूहिकरित्या तितकाच महत्त्वाचा ठरतो. त्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम खेळ क्रीडास्पर्धा आपापल्या भागातील लोकसंस्कृतीचे जतन, भूभागाचे संवर्धन, शेतीची मशागत अशा बऱ्याच गोष्टी जीवनमान उंचावण्यासाठी देखील गरजेच्या ठरतात. यातला अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे खेळ किंवा क्रीडा प्रकार हासुद्धा आहे. ज्यामधून खेळाडू किंवा क्रीडापटूंच्या नैपुण्याला वाव मिळतोच. परंतु लहानपणापासूनच खेळण्यासाठी उत्तम पद्धतीचे वातावरण निर्माण झाले तर लहानपणी झालेला हा खेळांचा सराव त्या त्या व्यक्तीच्या किंवा मुलाच्या व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो. विशेषतः लहान वयात खेळणे हा केवळ छंद किंवा आवड नसून तो अगदी तीन ते दहा बारा वर्षापर्यंतच्या मुलांचा तितकाच मूलभूत अधिकार ठरतो. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाने ११ जून हा दिवस लहान मुलांच्या खेळण्याचा अधिकार दिवस म्हणून लक्षात घेतला आणि आंतरराष्ट्रीय खेळ दिवस म्हणूनही तो स्वीकारला गेला.

**मैदानेच उपलब्ध नाहीत**

हा विषय खेळापुरता मर्यादित राहात नाही. एकूण प्रत्येक समाजाच्या किंवा देशाच्या उत्तम जीवनमानाची मूलभूत गरज ठरते.२०१४ पासून हा आंतरराष्ट्रीय खेळ दिवस पाळला जातो. परंतु त्याच्याकडे तितक्या गांभिर्याने पाहिले जात नाही. भारतात तर लहान मुलांच्या खेळण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होते. विकसित देशांनी लहान वयातच मुलांच्या खेळण्याच्या या अंगभूत गरजेला नेमकेपणाने ओळखले आणि मग शाळांमधल्या मैदानांपासून ते शिक्षणातल्या खेळकर पद्धतीपर्यंत खेळ या विषयाला महत्त्व दिले गेले. भारतात मात्र आजच्या अत्यंत विचित्र परिस्थिती पाहायला मिळते. लहान मुलांना भरपूर खेळता आले पाहिजे. हे वय त्यांचे खेळण्याचे असते. परंतु याच वयामध्ये लहान मुलांच्या या महत्त्वाच्या मुद्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. शाळांमध्ये मैदाने नाहीत. शहरांमधल्या गृहनिर्माण संस्थांमध्येदेखील अतिशय तुटपुंज्या खेळण्याच्या जागा असतात. मुंबईसारख्या महानगरात तर आज मैदानेच उपलब्ध नाहीत. तीच परिस्थिती आज देशातल्या सगळ्याच महानगरांची होते आहे. स्वाभाविकपणे ज्या वयात खूप खेळण्याची आवश्यकता असते. त्या वयात उत्तम प्रकारची संधीच मिळत नाही आणि मग कुठेतरी गल्लीबोळांमध्ये अंडर आर्म क्रिकेटसारख्या फुटकळ खेळांवर मुलांना समाधान मानून घ्यावे लागते. शाळांना तर मैदानेही उपलब्ध नसतात. तिथे होणारे शारीरिक शिक्षणाचे तास एक निव्वळ टाईमपास ठरतो. मुलांना पाहिजे तसे खेळता येत नाही म्हणून अनेक पालकांवर पैसे भरून खेळाच्या कोचिंगला पाठवण्याची वेळ येते. मोठ्या शहरांमधली मैदानेसुद्धा अनेक खाजगी संस्थांना भाडेपट्ट्यावर दिली जातात. स्वाभाविकपणे त्याठिकाणीसुद्धा लहान मुलांना खेळण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य उपलब्ध होत नाही. खेळ हा लहान मुलांचा मूलभूत अधिकार आहे हा विचारच आपल्याकडे स्वीकारला गेलेला नाही, संविधानातून कायद्यातून अनेक प्रकारचे हक्क आणि अधिकार दिले जातात. शिक्षणाचा हक्क दिला गेला. पण खेळण्याचा हक्क कायदेशीरपणे मिळू शकलेला नाही. प्रामुख्याने लहान मुलांच्या उपजत अशा खेळाच्या गुणांचा हा सर्वात मोठा अपमान ठरतो.

**मुलांच्या हातात मोबाईल**

आज खेळांचे विविध प्रकार निघाले आहेत. क्रिकेटसारख्या खेळाने गल्लोगल्ली धुमाकूळ घातलेला आहे. शेकडो स्पर्धा होत असतात. म्हणजेच तरुण वयातल्या सर्व प्रकारच्या खेळ प्रकारांना आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त झालेली आहे. देशादेशांमध्ये होणाऱ्या क्रीडा स्पर्धा राष्ट्रकुल स्पर्धा, ऑलिंपिक स्पर्धांचा समावेश होतो. खेळांमधून तरुणांमधल्या खिलाडूपणाला उत्तेजन दिलेही जाते. यासाठी ६ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय खेळ आणि शांतता दिवस म्हणूनही पाळला जातो. कारण क्रीडास्पर्धांच्या माध्यमातून सामंजस्यपूर्ण वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. परंतु चार ते दहा या वयोगटात ज्या उत्स्फूर्त आणि उत्साहाने खेळ खेळण्याची प्रवृत्ती असते. ती तितक्याच संवेदनशीलतेने जपण्याची गरज आहे. आज मैदाने नसल्याने मुले घराच्या बाहेरही पडत नाहीत. मैदानांची जागा मोबाईलवरच्या खेळांनी घेतली आहे. आज अगदी पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची हाती मोबाईल असतात आणि मोबाईलवरचे गेम खेळण्यात त्यांचे तासनतास वाया जात असतात. जर या वयोगटातल्या मुलांचा खेळ हा अधिकार आहे. हे तत्त्व जर मान्य झाले तर घरात मोबाईलवर गुंतून पडणारी मुले मैदानावर निश्चितपणे येतील त्यासाठी सरकारी धोरणांमध्ये खूप मोठ्या बदलांची आवश्यकता आहे. विशेषतः लहान वयातील खेळ खेळण्याच्या या प्रेरणा समाजाच्या उत्तम जीवनमानाशी संबंधित आहेत. हे विसरून चालणार नाही. खेळातून मनाची आणि शरीराचीही जडणघडण होते. या वयात अभ्यासाइतकाच खेळदेखील महत्त्वाचा असतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

एखाद्याने विनाकारण आपल्याला वाईट म्हटलं तर फारसं मनावर घेऊ नये. कारण या जगात असा कोणीही नाही ज्याला सगळे लोक चांगलं बोलतात.

## पंचांग



**गुरुवार, ११ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ कृष्ण एकादशी**
**नक्षत्र : रेवती**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१५**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०८-१६ मीन**
**०८-१७ ते २४-०० मेष**

**कमला एकादशी, श्री साने गुरुजी स्मृतिदिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### अमृतसरी छोले भटुरे




★ **साहित्य :-** १ वाटी छोले, पाणी गरजेनुसार, १ चमचा चहापावडर, १ टीस्पून तेल, १ टीस्पून जिरे, ३-४ बारीक चिरलेले कांदे, १ टीस्पून आले-लसूण पेस्ट, ३ टोमॅटो (प्युरी केलेली), २ टीस्पून छोले मसाला, १ टीस्पून लाल तिखट, १ चमचा खडे मसाले (१ तमालपत्र, २-३ लवंगा, १ दालचिनीचा तुकडा, २ हिरवी वेलची), १ चमचा जिरे, १/२ चमचा हळद, २ चमचे छोले मसाला, १/२ चमचा गरम मसाला, कोथिंबीर, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर, **भटुरे साहित्य-** मैदा: २ कप, दही: १/२ कप, साखर: १/२ छोटा चमचा, बेकिंग सोडा (किंवा इनो): १/२ छोटा चमचा, मीठ: चवीनुसार, तेल: भटुरे तळण्यासाठी.

★ **कृती :-** छोले चांगले धुवा आणि पुरेशा पाण्यात किमान ७-८ तास किंवा रात्रभर भिजवा. भिजवलेले चणे कुकरमध्ये घ्या. त्यात २ कप पाणी, खडे मसाले आणि चहापावडर एका सुती कापडात बांधून त्याची पुरचुंडी करून त्यात टाका. कुकरच्या ५-६ शिट्ट्या काढून चणे मऊ शिजवून घ्या. शिजल्यावर पुरचुंडी काढून टाका.

गॅस चालू करून त्यावर एक कढई ठेवा त्यात तेल टाका. जिरे टाका, कांदा घाला आणि हलका तपकिरी होईपर्यंत मध्यम आचेवर चांगले परता. कांदा हलका सोनेरी होऊ लागला की त्यात आले-लसूण पेस्ट घालून चांगले परतून घ्या. टोमॅटो प्युरी घालून तेल सुटेपर्यंत चांगले शिजू द्या. यामध्ये हळद, तिखट, छोले मसाला, गरम मसाला आणि मीठ घाला. मसाले चांगले परतून घ्या. आता शिजवलेले छोले आणि थोडे पाणी घालून मंद आचेवर ५ ते १० मिनिटे उकळू द्या. शेवटी बारीक चिरलेली कोथिंबीर घालून गॅस बंद करा.

मैद्यात रवा, दही, बेकिंग सोडा, मीठ आणि थोडे तेल घालून कोमट पाण्याने मऊ पीठ मळून घ्या. हे पीठ २ तास ओल्या कपड्याने झाकून ठेवा. नंतर त्याचे जाडसर भटुरे लाटून कडकडीत तेलात सोनेरी रंगावर तळून घ्या.




# आयसीसीची क्रमवारी जाहीर! गिलची झेप

## इंग्लंडचा हॅरी ब्रुक पुन्हा अव्वल स्थानावर



**इंग्लंडचा उपकर्णधार हॅरी ब्रुकने पुन्हा आयसीसीची कसोटी फलंदाज क्रमवारीत पहिले स्थान पटकाविले. त्याने आपला सहकारी खेळाडू जो रूटकडून अव्वल स्थान हिसकावून घेतले. पूर्वी ब्रुक डिसेंबर २०२४ मध्ये अव्वल स्थानी पोहोचला होता. भारताचा कर्णधार शुभमन गिलने क्रमवारीत आठव्या क्रमांकावर पोहोचला. अष्टपैलूंच्या क्रमवारीत अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरनेही लक्षणीय झेप घेतली. त्यासोबत कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत कुलदीप यादवने १४ व्या क्रमांकावर स्थान मिळवले.**

■ लंडन

**हॅरी** ब्रुकने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या डावात एक महत्त्वपूर्ण अर्धशतक झळकावले, ज्यामुळे त्याला क्रमवारीत अव्वल स्थान मिळण्यास मदत झाली. रूट दोन्ही डावांमध्ये मिळून ९ धावा करू शकला. या खराब कामगिरीमुळे फलंदाजांच्या क्रमवारीत तो पहिल्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर घसरला. ऑस्ट्रेलियाचा स्फोटक फलंदाज ट्रॅव्हिस हेडला रुटच्या खराब कामगिरीचा फायदा झाला. हेड आता दुसऱ्या स्थानावर पोहोचला. इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील मालिकेतील दुसरी कसोटी १७ जूनपासून ओव्हलवर खेळवली जाईल. रूटला पुनरागमन करण्याची संधी मिळेल. अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीत भारताचा कर्णधार शुभमन गिलने शानदार शतक झळकावले. या शतकामुळे गिलला फलंदाजांच्या क्रमवारीत २ स्थानांची झेप घेण्यास मदत झाली. तो आता आठव्या क्रमांकावर पोहोचला. गोलंदाजांच्या क्रमवारीत कुलदीप यादवने एका स्थानाची झेप घेऊन १४ व्या क्रमांकावर स्थान मिळवले. अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरनेही लक्षणीय झेप घेतली. अष्टपैलूंच्या क्रमवारीत २ स्थानांची झेप घेऊन तो नवव्या स्थानावर पोहोचला. इंग्लंडचा बेन डकेट ३ स्थानांनी वर चढून १५ व्या स्थानावर पोहोचला, तर यष्टीरक्षक जेमी स्मिथने ५ स्थानांची झेप घेऊन २३ वे स्थान पटकावले. न्यूझीलंडचा ग्लेन फिलिप्सही १५ स्थानांनी पुढे जात ४० व्या स्थानावर पोहोचला.

लॉर्ड्स कसोटीच्या शेवटच्या डावात ३० धावांत ५ बळी घेणारे इंग्लंडचे वेगवान गोलंदाज गस टकिन्सन यांना फायदा झाला आहे. ते कसोटी क्रमवारीत ७ स्थानांनी वर चढून १० व्या स्थानावर पोहोचले आहेत. ते अष्टपैलू खेळाडूंच्या यादीतही दोन स्थानांच्या सुधारणेसह सहाव्या क्रमांकावर आले आहेत. दीर्घ विश्रांतीनंतर कसोटी क्रिकेटमध्ये परतलेले काईल जेमीसन २२ व्या आणि ओली रॉबिन्सन २३ व्या स्थानावर पोहोचले आहेत.

# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पाकिस्तानी संघ जाहीर

■ कराची



साहिबझादा फरहान कर्णधार

**जपानमध्ये** सप्टेंबर-ऑक्टोबरदरम्यान खेळवल्या जाणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. अनुभवी बाबर आझम आणि शाहीन आफ्रिदी यांना या संघातून वगळले आहे. या संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी साहिबझादा फरहान याच्याकडे सोपवण्यात आली. अब्दुल समद याची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली. या संघात आकिफ जावेद, अली रझा, माझ सदाकत आणि साद मसूद यांचा समावेश आहे. या खेळाडूंना अद्याप पाकिस्तानकडून टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधीही मिळाली नाही. साहिबजादा फरहानने टी-२० विश्वचषकात सर्वाधिक धावा करत पाकिस्तानला सुपर-८ फेरीपर्यंत मजल मारून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

उपांत्य फेरीपूर्वी पाकिस्तानचे आव्हान संपुष्टात आले असले तरी फरहानची कामगिरी विशेष ठरली.

**पाकिस्तानी संघ** साहिबझादा फरहान (कर्णधार), अब्दुल समद (उपकर्णधार), अबरार अहमद, अहमद दानियाल, आकिफ जावेद, अली रझा, अराफात मिन्हास, हैदर अली, हसन नवाझ, माझ सदाकत, मोहम्मद सलमान मिर्झा, साद मसूद, सैम अयुब, सुफियान मोकीम आणि उस्मान खान (यष्टिरक्षक).

# फिफा विश्वचषक जिंकणाऱ्या विजेत्याला ४७६ कोटी मिळणार

■ मेक्सिको सिटी

**फिफा** विश्वचषक अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको यांच्या संयुक्त विद्यमाने १२ जून रोजी सुरू होणार आहे. यावर्षी फिफाने बक्षीस रकमेत लक्षणीय वाढ केली. कतारमध्ये २०२२ साली झालेल्या फिफा विश्वचषक स्पर्धेची एकूण बक्षीस रक्कम ४४० दशलक्ष डॉलर होती, परंतु २०२६ च्या स्पर्धेसाठी ती वाढून ६५५ दशलक्ष डॉलर झाली आहे. विजेत्या संघाला ५० दशलक्ष डॉलर म्हणजेच ४७६ कोटी रुपये मिळतील. ही रक्कम एकटीच अनेक आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या एकूण बक्षीस रकमेपेक्षा जास्त आहे. उपविजेता संघाला ३१४ कोटी रुपये मिळणार आहेत. त्यासोबत तिसऱ्या स्थानी राहणाऱ्या संघाला २७६ कोटी रुपये, चौथ्या स्थानी असलेल्या संघाला २५७ कोटी रुपये, ५ ते ८ स्थानांवर राहिलेल्या संघांना १८१ कोटी रुपये, ९व्या ते १६व्या स्थानांवर राहिलेल्या संघांना १४३ कोटी रुपये, १७ ते ३२ वे स्थानांवर असलेल्या संघांना १०५ कोटी रुपये, ३३ ते ४८ व्या स्थानांवर असलेल्या संघांना ८६ कोटी रुपये बक्षीस मिळणार आहे.

# अफगाणिस्तान एकदिवसीय मालिकेतून हार्दिक बाहेर

**बंगळुरु** - भारताचा स्टार अष्टपैलू हार्दिक पांड्या अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला. त्याने आपली फिटनेस चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली होती. दुसऱ्या दिवशीच हार्दिकच्या पायाला दुखापत झाली असून त्यामुळे त्याला या मालिकेला मुकावे लागणार आहे. त्याला आणखी दोन आठवडे बंगळुरु येथील बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये थांबावे लागेल. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकदिवसीय मालिका १३ जूनपासून सुरू होणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्यालय, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०३

दूरध्वनी : २५०१०२/ २५५१५०१
ई-मेल : amca.vvmc@gov.in
जा.क्र.: व.वि.श.म./बांध/६६९/२०२६
दि. : ०८/०६/२०२६

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**जाहीर ई - निविदा सुचना**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | विरार (प) येथील बोळींज सोपारा मुख्य रस्त्यावरील महालक्ष्मी राईस मिल ते ज्ञानेश्वरी बंगल्यापर्यंत पाईप गटार बांधणे. | रु.२९,०९,५८२/- |

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' बोळींज विभागातील खालील उल्लेखीत कामांचे कोरे निविदा फॉर्म (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर दि.११/०६/२०२६ पासुन उपलब्ध होणार आहे. ई टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

**Please Visit our official web-site (https://mahatenders.gov.in)**

सही/-
**(प्रदिप पाचंगे)**
प्र. शहर अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

जावक क्र. : व.वि.श.म./मा.व.ज./२९५/२०२६

# आकाश टायगर्सचा अंतिम फेरीत प्रवेश

■ मुंबई

**नुवामा** प्रायव्हेट टी-२० मुंबई महिला लीगच्या पहिल्या हंगामात 'आकाश टायगर्स मुंबई वेस्टर्न सबर्ब्स' संघाने दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला. बुधवारी वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात त्यांनी 'ठाणे स्काय रायझर्स'चा आठ विकेट राखून पराभव केला.

११४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सानिका चाळके हिने शानदार फलंदाजी करत ५१ चेंडूंमध्ये नाबाद ७४ धावा केल्या. तिच्या खेळीत ११ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. सुरुवातीला हुमैरा काझीसोबत ३५ धावांची भागीदारी केल्यानंतर टायगर्सला एकामागोमाग दोन धक्के बसले, मात्र सानिकाने संयम राखत डाव सावरला. तिला फातिमा जाफरची चांगली साथ लाभली. जाफरने नाबाद ३५ धावा करत तिसऱ्या विकेटसाठी ८२ धावांची नाबाद भागीदारी उभारली.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना क्र. १२**
**ई निविदा सूचना क्र. ५२/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक ०४/११/२०२५ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक सागर, ठाणे, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक एक्टीव टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा उपलब्धता, पुर्व अहर्ता बैठक व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये कोटी |
|---|---|---|
| १. | शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई चा पुनर्विकास व मऔवि महामंडळाच्या ''रतन टाटा उद्योग भवन'' (मऔविम मुख्यालय) च्या इमारतीचे अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (ईपीसी) करार पध्दतीने बांधकाम करणे. | ₹ ९०३.०८ |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/०८/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

पुर्व अहर्ता बैठक दिनांक १४/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मुख्य अभियंता (मुख्या.), मऔविम, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई-९३ यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा दिनांक ३१/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# गोव्यातील शॅकना १ वर्ष मुदतवाढ समुद्र किनाऱ्यावर 'ड्रोन'ची पाळत

## पर्यटनमंत्री खवटे यांची माहिती

■ मडगाव

**गोवा** राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर असणाऱ्या पर्यटक शॅकना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. १५ ऑगस्टपासून शॅक मालकांकडून अर्ज स्वीकारण्यास पर्यटन खाते सुरुवात करेल. तसेच विविध समुद्र किनाऱ्यांवर पाळत ठेवण्यासाठी 'ड्रोन' चा वापर केला जाईल, अशी माहिती पर्यटनमंत्री रोहन खवटे यांनी दिली.

शॅक मालकांबरोबर झालेल्या एका विशेष बैठकीनंतर पर्यटनमंत्री रोहन खवटे यांनी ही माहिती दिली. मंत्री खवटे म्हणाले की, गोव्यातील समुद्र किनाऱ्यांवर कचरा, बेकायदेशीर दलालांचा सुळसुळाट तसेच अतिक्रमणांवर आता ड्रोनद्वारे लक्ष ठेवले जाणार आहे. आगामी पर्यटन हंगामापासून ड्रोन सर्वेलन्स यंत्रणा कार्यान्वित केली जाईल.ही यंत्रणा 'गोवा बीच हेजिल' ॲपला जोडली जाईल. याशिवाय राज्यातील किनाऱ्यावर असणाऱ्या पर्यटक शॅकना एक वर्षाची मुदतवाढ देण्याचाही निर्णय झाला आहे. यंदाच्या पर्यटन हंगामाला १ सप्टेंबरपासून सुरुवात होईल. १५ ऑगस्टपासून शॅक मालकांकडून अर्ज स्वीकारण्यास पर्यटन खाते सुरुवात करेल.

# कारापूरचा लोढा प्रकल्प रद्द करा,अन्यथा तीव्र जनआंदोलन

## आमदार विरेश बोरकर यांचा जाहीर इशारा

■ पणजी

**गोव्यातील** डिचोली तालुक्यातील कारापूर-सर्वण गावात 'द हाऊस ऑफ अभिनंदन लोढा' या गृह प्रकल्पाविरोधात ग्रामस्थांनी आंदोलन सुरू केले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास आणि संसाधनांवर पडणारा ताण या कारणांमुळे स्थानिकांचा या प्रकल्पाला कडाडून विरोध आहे. या स्थानिकांच्या आंदोलनाला पाठिंबा देत आमदार विरेश बोरकर यांनी तर प्रकल्प बंद केला नाही तर जनआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

स्थानिकांच्या मागणीला पाठिंबा देत रिव्होल्युशनरी गोयन्स पार्टीचे आमदार विरेश बोरकर यांनी हा प्रकल्प तातडीने बंद करण्याची व त्याच्या परवानग्या रद्द करण्याची मागणी केली आहे. पर्यावरणीय नुकसान आणि स्थानिक संसाधनांवर पडणारा ताण या कारणांमुळे ग्रामस्थ अनेक महिन्यांपासून श्री शांतादुर्गा मंदिराजवळ साखळी आंदोलन करत आहेत.

देश विदेश

# आयफोनमुळे अमेरिकेच्या जन्मदरात घट संशोधनातून निघाला धक्कादायक निष्कर्ष



■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचा** जन्मदर सातत्याने कमी कमी होत चालला असून त्याचे एक कारण ॲपलचा आयफोन असू शकते, असा धक्कादायक निष्कर्ष नव्या संशोधनातून काढण्यात आला आहे. आयफोनमुळे तरुणांमधील प्रजोत्पादन क्षमता कमी होत आहे. विशेषतः किशोरवयीन मुला-मुलींमध्ये आयफोनच्या अतिवापरामुळे प्रजोत्पादनाची क्षमता कमी होत आहे, असे अहवालात म्हटले आहे.

नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्चने (एनबीईआर) हा संशोधन अहवाल प्रसिद्ध केला आहे.२००७ मध्ये ॲपल कंपनीने आयफोन बाजारात आणल्यापासून जन्मदर कसा कमी होत गेला याचा अभ्यास संशोधकांनी अमेरिकेच्या विविध राज्यांमध्ये केला. त्यातून असे आढळून आले की, ज्या राज्यांमध्ये आयफोन सर्वात आधी लोकांपर्यंत पोहोचला त्या राज्यांमध्ये जन्मदर झपाट्याने घटला.तर ज्या राज्यांमध्ये आयफोन काहीसा उशिराने पोहोचला त्या राज्यांमध्ये जन्मदरात तुलनेने कमी प्रमाणात घट झाली. २००७ ते २०११ या कालावधीत १५ ते ४४ वर्षांच्या महिलांमध्ये प्रजोत्पादन क्षमता कमी होण्यामध्ये ३३ ते ५२ टक्के योगदान आयफोनचे आहे. विशेषतः १५ ते १९ आणि २० ते २४ या वयोगटातील तरुणींमध्ये आयफोनच्या वापरामुळे प्रजोत्पादन क्षमता कमी होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे,असेही अहवालात म्हटले आहे.

# जपाननंतर नेपाळचीही भारतीय आंब्यांवर बंदी



■ काठमांडू

**भारतीय** आंब्यांच्या निर्यातीला आणखी एक धक्का बसला आहे. जपाननंतर आता नेपाळनेही भारतीय आंब्यांच्या आयातीवर बंदी घातली आहे. आंब्यांमध्ये कीटकनाशकांचे प्रमाण जास्त असल्याचा दावा आणि सीमावर्ती भागांतील अपुऱ्या विलगीकरण सुविधांचे कारण देत नेपाळ प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

नेपाळच्या मधेश प्रांतातील भूमी व्यवस्थापन, कृषी आणि सहकारी मंत्रालयाने भारतीय आंब्यांच्या आयातीवर निर्बंध लागू केले आहेत. मंत्रालयाचे माहिती अधिकारी अजय ग्यावली यांनी सांगितले की, या बंदीमुळे स्थानिक उत्पादकांना फायदा होणार असून भारतीय आंब्यांशी स्पर्धा करण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळेल. मधेश प्रांतातील सिराहा, सप्तरी आणि धनुषा हे नेपाळमधील प्रमुख आंबा उत्पादक जिल्हे मानले जातात. सध्या स्थानिक बाजारपेठांमध्ये देशी आंब्यांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत आहे. मात्र, देशातील एकूण मागणीच्या तुलनेत स्थानिक उत्पादन अपुरे ठरण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

भारतीय आंब्यांच्या आयातीवरील बंदीमुळे नेपाळमधील व्यापारी आणि आंबा प्रक्रिया उद्योगांनी चिंता व्यक्त केली आहे.

# पाकव्याप्त काश्मिरात आंदोलन चिघळले सैन्याचा गोळीबार! ३० हून अधिक ठार

■ मुझफ्फराबाद

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**पाकव्याप्त** काश्मीरमध्ये (पीओके) नागरी हक्क आणि मूलभूत सुविधांच्या मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाने हिंसक वळण घेतले आहे. आंदोलनकर्त्यांवर पाकिस्तान सैन्याने गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेत ३० हून अधिक जणांचा मृत्यू तर २००० पेक्षा जास्त लोक जखमी झाल्याचा दावा केला आहे. यामुळे पीओकेमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. जम्मू-काश्मीर संयुक्त अवामी ॲक्शन कमिटी (जेएएसी) या प्रमुख नागरी हक्क संघटनेने ९ जून रोजी 'लाँग मार्च'चे आवाहन केले होते. गेल्या अनेक वर्षांपासून ही संघटना स्थानिक प्रशासन, अनुदान धोरणे, वीजदर आणि मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नांवर आंदोलन करत आहे. अलीकडे पाकिस्तान समर्थित स्थानिक प्रशासनाने जेएएसीला 'दहशतवादी संघटना' घोषित केल्यापासून परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली आहे. जेएएसीच्या नेतृत्वाखाली पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) नागरिकांकडून पाकिस्तान सरकार आणि लष्कराविरोधात सुरू असलेले आंदोलन अधिक तीव्र झाले आहे.

# इंजिनिअरिंगसाठी केरळ सरकारची गुण सामान्यीकरण पद्धती योग्यच

## केरळ हायकोर्टाचा निर्वाळा

■ तिरुवअनंतपुरम

**इंजिनिअरिंग** प्रवेशासाठी आयसीएसई, सीबीएसई आणि एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी केरळ सरकारने स्वीकारलेल्या नव्या गुण सामान्यीकरण (मार्क नॉर्मलायझेशन)पद्धतीमध्ये काहीही दोष आढळून आलेला नाही. ही पद्धती राबवण्यास काहीही हरकत नाही, असा स्पष्ट निर्वाळा केरळ उच्च न्यायालयाने दिला. या नव्या पद्धतीला सीबीएसई बोर्डाच्या काही विद्यार्थ्यांनी आव्हान दिले होते. ही याचिका न्यायालयाने फेटाळली.

केरळ सरकारने या अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी यापूर्वी वापरात असलेल्या गुण प्रमाणीकरण (मार्क स्टँडर्डायझेशन ) पद्धतीऐवजी गुण सामान्यीकरण पद्धती स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंबंधी सरकारने केरळ



इंजिनिअरिंग आर्किटेक्चर अँड मेडिकल (केईएएम)-२०२६ परिपत्रक जारी केले आहे. केईएएम-२०२६ परिपत्रकातील कलम १.४ आणि ९.७.४ मधील तरतुदींना सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी विरोध केला होता. नवी पध्दती कोणत्याही शास्त्रीय अभ्यासाविना आणि तज्ज्ञांचा सल्ला न घेता सरकारने स्वीकारली असून या पद्धतीमुळे सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होईल, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते. न्या. बेचू कुरियन थॉमस यांच्या न्यायासनासमोर याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्या.थॉमस यांनी नव्या पध्दतीमध्ये कोणताही दोष किंवा विविध बोर्डाच्या विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव झाल्याचे दिसून येत नाही.

# कांदा दर घसरणीवर तोडगा काढण्यासाठी विशेष उपसमिती

## १५ दिवसांत अहवाल सादर करण्याची सूचना

■ मुंबई

**कांदा** दर घसरणीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने तज्ज्ञांची एक विशेष उपसमिती स्थापन केली आहे. या उपसमितीला केंद्राच्या निर्यात धोरणाचा आणि बाजारभावावरील परिणामांचा सखोल अभ्यास करून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याची सूचना दिली आहे.

मंत्रालयीन सचिव स्तरावर यापूर्वीच २३ एप्रिल रोजी एक मुख्य समिती गठित करण्यात आली होती. मात्र, कांदा दर घसरण आणि निर्यात धोरण यांसारख्या गंभीर विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा थेट उपयोग व्हावा यासाठी आता या मुख्य समितीअंतर्गत ही विशेष उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. शासनाने ९ जून रोजी याबाबतचा अधिकृत शासन निर्णय जारी केला. कांदा दर घसरण्याची कारणे, उच्च तापमानातील साठवणूक, कांद्यापासून उपउत्पादने तयार करणे आणि मागील ७ ते ८ वर्षातील केंद्र सरकारच्या निर्यात धोरणाचा व त्याचा बाजारभावावरील परिणामांचा अभ्यास करणे हा उपसमिती स्थापण्यामागील उद्देश आहे.

या उपसमितीत माजी कुलगुरू डॉ.किसनराव लवांडे, माजी पणन संचालक सुनील पवार, इंडो व्हेजिटेबलस् डेव्हलपेमंट असोसिएशनचे अध्यक्ष सारंग निर्मल, नरेंद्र पवार यांचा समावेश आहे. पणन संचालक शरद जरे हे याचे सदस्य सचिव आहेत.

# म्हाडा वसाहत समस्यांच्या विळख्यात हजारो रहिवाशांचा पालिकेवर मोर्चा

■ विरार

**विरारमधील** म्हाडा वसाहतीमधील हजारो रहिवाशांनी समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी वसई-विरार महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढला. हजारो महिला पुरूष या मोर्चात सहभागी होते.

विरार पश्चिमेच्या बोळींज येथे म्हाडा वसाहत असून साडेनऊ हजार सदनिका आहेत. या वसाहतीतील या रहिवाशांना गेल्या काही वर्षांपासून अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. मात्र केवळ आश्वासन देऊन त्यांची बोळवण केली जात आहे. या रहिवाशांनी शेवटी पालिका प्रशासनाला जाब विचारत आज दुपारी पालिका मुख्यालयावर मोर्चा काढला. या मोर्च्यात हजारो नागरिक सहभागी झाले होते. पाणीटंचाई सोडवावी, खेळाचे मैदान उपलब्ध करून द्यावे, स्मशानभूमी हटवावी, बससेवा सुरू करावी आदी विविध मागण्या रहिवाशांनी केल्या. महापौर अजीव पाटील यांनी मोर्चाच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. पाणी समस्या सोडविण्यासाठी प्रभागनिहाय पध्दत बंद करून नियमित पाणी सोडण्याचे निर्देश त्यांनी पालिका अधिकाऱ्यांना दिले. पालिकेच्या ताब्यात असलेले खेळाचे मैदान एक दिवसाआड उपलब्ध करून दिले जाईल, बससेवा सुरू केली जाईल, असे आश्वासन पाटील यांनी दिले.

GOVERNMENT OF MAHARASHTRA, HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
MAHARASHTRA MARITIME BOARD
Indian Mercantile Charnbers. 2nd Floor. Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate.
Mumbai - 400 001. Tel.: 022-69041777 Fax: 022-69041740
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb@gmail.com

**E-Tender Notice**

**Main Portal:** https://mahatenders.gov.in

Maharashtra Maritime Board (MMB), Mumbai, hereby invites bids from the eligible agencies for the following works:

| Sr. No. | Name of Work | Date and Time |
|---|---|---|
| 1 | Appointment of NABET Accredited Environmental Consultant for obtaining CRZ Clearance, Environmental Clearance including Preparation of Environmental Impact Assessment (EIA) Report, Environment Management Plan (EMP), Forest Clearance and Ecological Sensitive Zone Clearances for Mumbai Water Metro Project (Phase 1) - 2nd Call | 09.06.2026 @1900 Hrs |

The details can be viewed online and downloaded directly from the Government of Maharashtra E-Tendering Portal **https://mahatenders.gov.in** from **09.06.2026 at 1900** hours (IST) till **16.06.2026** at **1700** hours.
MMB reserves the right to accept or reject any or all of the bids without assigning any reason whatsoever.

Date: 09.06.2026
Place: Mumbai

Sd/-
Chief Executive Officer,
Maharashtra Maritime Board, Mumbai.

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी १०७४

# ठाण्यातील नालेसफाईच्या कामावरून मनसेचे आयुक्तांच्या दालनाबाहेर आंदोलन

■ ठाणे

**ठाणे** महापालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे योग्य प्रकारे पूर्ण झालेली नसल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महापालिका आयुक्तांच्या दालनाबाहेर आंदोलन केले. यावेळी मनसेने विविध पुरावे सादर करत संबंधित ठेकेदारांवर कारवाईची मागणी केली.

ठाणे शहरात पावसाळ्यात नाले तुंबण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे हाती घेतली जातात. यंदा ही कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर ठेकेदारांना ५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तरीही अनेक ठिकाणी नालेसफाईची कामे अपूर्ण असल्याचा दावा मनसेने केला आहे. याच मुद्यावरून मनसेचे ठाणे शहराध्यक्ष रवींद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनाबाहेर आंदोलन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली.

दि हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह बँक लि.,मुंबई
The Hindusthan Co-Op. Bank Ltd., Mumbai
HEAD OFFICE : HORIZON TOWER, 1ST & 2ND FLOOR, JAI SHASHANK CO-OP. HSG. SOCIETY LTD., OPP. ATI, V.N. PURAV MARG, CHUNABHATTI, MUMBAI - 400 022. • Tel. No.: 022-24052121 / 2424 / 2525
Website : www.hindusthan.bank.in

**NOTICE**

| Sr. No. | Branch | Name |
|---|---|---|
| 1. | Thane | Dorai Kannu Bernard |
| 2. | Thane | Gangubai Tulsiram Thube |
| 3. | Thane | Ganesh Ramswamy Ramanna |
| 4. | Thane | Gorakhnath Devidas Sutar |
| 5 | Thane | Kamlesh D. Jain |
| 6. | Thane | Sunil Kashinath Jadhav |
| 7. | Thane | Santosh Hirachand Jain |
| 8. | Thane | Shyamsundar Paul |
| 9. | Thane | Joghsingh Guneshasingh Gelda |
| 10. | Thane | Modsingh Hanwant Singh |
| 11. | Kamothe | Vishal Parner Co.Op Credit Society Ltd |
| 12. | Kamothe | Sukamal Sen |

Above Account Holder had taken locker on hire basis from Bank's Thane and Kamothe Branch. This Account Holders neither renewed his lockers by paying rent nor returned it to the Bank. The notice sent to him through registered post returned, also they could not be contacted. Hence, it is informed to these Account Holders & heirs of the said Account Holders to pay the rent of Locker or return the Locker within 7 days from the publication of this Notice, otherwise it will be considered that the said locker holders are not interested in the locker. Thereafter Bank will take possession of this locker & appropriate action will be taken. Please take note of this.

Sd/-
Branch Manager
Thane & Kamothe Branch

Date :11.06.2026

**E-Tender Notice**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Tender for Appointment of Training Agency for Maharashtra Saurya Kaushal Yojana (Maha-SKY) of the Maharashtra Power Distribution Enhancement Program under MSKVY2.0 scheme funded by Asian Development Bank (ADB)**

The Chief Engineer (Special Projects), Prakashgad, Mumbai wishes the Bids from eligible bidders for Training Agency for Maharashtra Saurya Kaushal Yojana (Maha-SKY) for Maharashtra Power Distribution Enhancement Program under MSKVY 2.0 scheme funded by Asian Development Bank (ADB) under MSEDCL, Maharashtra through **e-tendering website of MSEDCL,** duly super scribing with tender No., due date and opening date & time as follows:

| Tender No. | Tender Cost (Rs. Lakhs) | * Tender Fees (Rs.) |
|---|---|---|
| CE-SPD/MSKVY2.0/ADB-MahaSKY/Mumbai/26-27/T-01 | 731.05 | 11800.00 |

* Tender Fee (including 18% GST) is to be paid by e-payment only, directly through net banking to MAHADISCOM account.

- Availability of bid documents on website — 10-06-2026
- Date and time of sale of bid documents — 10-06-2026 at 12.00 Hrs
- Date and time of pre Bid Meeting — 17-06-2026 at 12.00 Hrs
- Date & time of Bid Submission — 24-06-2026 up to 15.00 Hrs
- Date and time of opening of technical bids — 24-06-2026 at 16.00 Hrs

This notice is general intimation for the interested Bidders. The details of the tenders are available on MSEDCL's e-tendering Website https://etender.mahadiscom.in/eatApp/.
The Agencies are requested to visit our website to register themselves for e-Tenders. Memorandum/ corrigendum etc. will not be published in the newspaper.

Sd/-
Chief Engineer (Special Projects)
MSEDCL, Mumbai

HO PR NO 135/26 dt.10.06.26

# ठाणे अग्निशमन दलातील सागर शिंदेंना 'शहीद' दर्जा द्या!

## माजी नगरसेवक सीताराम राणेंची मागणी

■ ठाणे

**गावदेवी** भाजी मंडईला लागलेल्या आगीमध्ये बचावकार्य करताना वीरमरण आलेल्या ठाणे पालिकेच्या अग्निशमन दलातील अधिकारी सागर शिंदे यांना मरणोत्तर 'शहीद' दर्जा देण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेवक सीताराम राणे यांनी पालिका आयुक्तांना पत्र देऊन शासनाकडून शहिदांना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती व लाभ तातडीने मंजूर करून देण्याची मागणी केली आहे. त्यासाठी राज्य शासनाच्या निर्णयाच्या आधारे मुंबई पालिकेने यासंबंधी घेतलेल्या निर्णयाचा दाखलाही दिला आहे. गावदेवी परिसरात भाजी मंडई इमारतीत पालिकेचे तसेच इतर शासकीय कार्यालये आहेत. या इमारतीत २१ मे रोजी आग लागली. नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावत असताना अग्निशमन अधिकारी सागर शिंदे यांचा मृत्यू झाला होता. अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या सुरक्षेसाठी सातत्याने जीव धोक्यात घालून काम करतात. त्यामुळे कर्तव्य बजावताना प्राण गमावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या शौर्य, त्याग व सेवाभावाचा गौरव व्हावा, भावी पिढ्यांसमोर आदर्श निर्माण व्हावा, या उद्देशाने शिंदे यांना 'शहीद' दर्जा देण्याची मागणी त्यांनी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN by the Shaikhbhai Rahivashi Sangh, the committee of tenants and occupants of the structure formerly known as "Shaikhbhai Building" (Building Nos. 120–124, Cess No. E-4756) on land bearing C.S. No. 1480 of Byculla Division, Shivdas Chapsi Marg, Byculla, Mumbai, to the public and in particular to any person claiming to be the owner of the property described in the Schedule hereunder written, as follows:

The said cessed building, declared "C-1" and since demolished, is being redeveloped under the MHADA Act, 1976. A notice under Section 79-A(1)(a) was issued by the MBR&R Board to the owner/landlord on or about 09.10.2023; the owner/landlord did not respond or submit any proposal, and the procedure under Section 79-A(1)(b) was thereafter initiated. The matter is presently before the Hon'ble Justice J. P. Devadhar Committee (constituted by Order dated 28.07.2025 in W.P.(L) No. 34771 of 2024) and in Writ Petition No. 1747 of 2026, to which we are party.

Despite our repeated and bona fide efforts to trace and contact the actual owner, no person holding documentary proof of ownership and legal possession has come forward.

WE HEREBY CALL UPON the actual owner of the said property, and any person claiming any right, title or interest therein, to contact the Committee at the address below within fifteen (15) days of publication hereof, with original documentary proof of ownership and legal possession (including the chain of title and any succession documents), so as to participate in the redevelopment in accordance with law. Failing such response, the fact of non-appearance and our efforts to trace the owner shall be placed on record before the said Committee and the Hon'ble High Court, and we shall proceed with the redevelopment in accordance with law.

**THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO**

ALL THAT piece or parcel of land bearing C.S. No. 1480 of Byculla Division, admeasuring approximately 296.82 sq. meters (355 sq. yards), at Shivdas Chapsi Marg (Mazgaon Road), Mumbai – 400 009, with the structure formerly standing thereon known as "Shaikhbhai Building" (Building Nos. 120–124, Cess No. E-4756); bounded on the East by Shivdas Chapsi Marg, and on the North, South and West by C.S. Nos. 1/1479, 1A/1479, 1B/1479 and 1D/1479 of Byculla Division.

Dated this day of 11th June, 2026.
Place: Mumbai.
For and on behalf of the
Shaikhbhai Rahivashi Sangh
Sd/- Chairman Sd/- Secretary -
Address: Swadeshi Mill, Sankraman Shibir, B/2, Seconed Floor, Flat no-202, Chunabhatti East, Mumbai – 400022.
[Contact telephone - 9869152851
email for correspondence - shailendr.mayekar.24@gmail.com]

# वसई-विरार पालिकेची एकही शाळा नाही जिल्हा परिषदेकडील हस्तांतरण रखडले

■ वसई

**जिल्हा** परिषदेकडील ११६ शाळा-वसई विरार महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची घोषणा पोकळ ठरली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होणार असून अद्याप शाळा हस्तांतरणाचा निर्णय झालेला नाही.

वसई-विरार महापालिकेची एकही शाळा नाही. शहरात जिल्हा परिषदेच्या १९२ पैकी ११६ शाळा या महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येत आहेत. या ११६ शाळा जिल्हा परिषदेकडून महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी १६ वर्षांपासून करण्यात येत होती. परंतु परिषदेने इमारती हस्तांतरित करण्यासाठी बाजार मूल्यानुसार रक्कम मागितल्याने पेच निर्माण झाला होता. बऱ्याच पाठपुराव्यानंतर १६ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत शाळा महापालिकेला विनामूल्य देण्याचे निर्देश दिले होते. त्यावर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मान्यतेसाठी प्रस्तावही सादर केला होता. परंतु जून महिना उजाडला तरी या शाळा हस्तांतरित झालेल्या नाहीत. शाळा पालिकेच्या ताब्यात आल्यानंतर शिक्षकांचे वेतन, निवृत्तीवेतन, इतर लाभ आदींचा बोजा पालिकेवर पडणार होता.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

क्र. झोपुप्रा,बृ/अभि/ओडी/अधिसूचना/विकासक श्री. रसिक ह. ठक्कर पार्टनर जालियान डेव्हलपर्स/३क (१) / कुरार/पीड/ २०२६ / २६८६९ — दिनांक: 10 JUNE 2026

**अधिसूचना**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ब च्या पोट कलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करुन दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (क) उप-कलम (१) अनुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा, बृहन्मुंबई) यांना आहेत.

त्याअर्थी उक्त कलम ३ (क) चे उपकलम (१) मधील अधिकाराचा वापर करुन मी खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ चे नियमन ३३ (१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे.

**अनुसूची**

मौजे कुरार, तालुका - बोरीवली

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वस क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र (चौ.मी.) | एकत्रित चतु: सिमा पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३१९ | १०३४.०९ | १०३४.०९ | न.भू.क्र. ३२० पै ३४५ | न.भू.क्र. ३१८ | न.भू.क्र. ३४५ | न. भू.क्र. ३१८ |
| २ | ३१९/१ ते ४ | ९५.३३ | ९५.३३ | | | | |
| ३ | ३२० | ५४२.०९ | ५३०.०० | | | | |
| ४ | ३२०/२ ते ११ | १७३.८५ | १७३.८५ | | | | |
| | एकूण | १८४५.३६ | १८३३.२७ | | | | |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई प्रशासकीय इमारत,
प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पुर्व) मुंबई ४०००५१.

स्वाक्षरी/-
(डॉ. महेंद्र कल्याणकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनि : ०२२-२६५६५८००/६९१२५८०० फॅक्स क्र. ०२२-२६५९०४५७, ई-मेल: info@sra.gov.in

# ‘लग जा गले’ येणार पुढील वर्षी

**धर्मा** प्रॉडक्शन्सच्या आगामी ‘लग जा गले’ या चित्रपटाची अधिकृत प्रदर्शन तारीख जाहीर करण्यात आली आहे. दिग्दर्शक राज मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली तयार होत असलेला हा ॲक्शन-मनोरंजक चित्रपट पुढील वर्षी १४ मे २०२७ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अभिनेता टायगर श्रॉफ, अभिनेत्री जान्हवी कपूर आणि लक्ष्य मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाच्या कथानकाबाबतचे तपशील अद्याप गुप्त ठेवण्यात आले आहे. ‘गुड न्यूज’, ‘जुगजुग जियो’ व ‘सेल्फी’ यांसारख्या कौटुंबिक व विनोदी चित्रपटांचे यशस्वी दिग्दर्शन करणाऱ्या राज मेहता यांच्यासाठी हा चित्रपट एका नव्या ॲक्शन प्रकारात पाऊल ठरणार आहे. डिसेंबर २०२५ मध्ये मुंबईतील मुकेश मिल्स येथे टायगर श्रॉफ व लक्ष्य यांच्यात चित्रित झालेल्या एका मोठ्या डान्स-ऑफ गाण्यामुळे याची जोरदार चर्चा रंगली होती. गणेश आचार्य यांच्या कोरिओग्राफीखाली आणि १०० हून अधिक व्यावसायिक नर्तकांच्या सहभागाने तयार झालेले हे गाणे चित्रपटाचे मुख्य आकर्षण असेल.











# ‘धमाल ४’ येणार आठवडाभर आधीच!

**‘धमाल’** या अत्यंत लोकप्रिय विनोदी चित्रपटाच्या मालिकेतील आगामी ‘धमाल-४’ या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. हा बहुप्रतीक्षित चित्रपट आता नियोजित वेळेच्या एक आठवडा आधी म्हणजेच १० जुलै रोजी चित्रपटगृहात दाखल होणार आहे. सुरुवातीला हा चित्रपट १७ जुलै रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु ३ जुलै रोजी अल्फा हा चित्रपट प्रदर्शित होत असल्याने १० जुलैची तारीख रिकामी होती. याच पार्श्वभूमीवर निर्मात्यांनी या तारखेचा लाभ घेण्याचे ठरवले आहे. चित्रपटाच्या अधिकृत घोषणेसोबतच निर्मात्यांनी या चित्रपटाचा एक आकर्षक सोनेरी रंगातील लोगो देखील प्रदर्शित केला आहे. इंद्रकुमार दिग्दर्शित या चित्रपटात अजय देवगण, अर्शद वारसी, रितेश देशमुख, जावेद जाफरी आणि संजय मिश्रा ही जुनी लोकप्रिय कलाकार मंडळी पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाली आहेत. त्यांच्यासोबत या भागात ईशा गुप्ता, संजिदा शेख, अंजली आनंद, उपेंद्र लिमये, विजय पाटकर आणि रवी किशन यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहेत. अजय देवगण, भूषण कुमार, क्रिशन कुमार, अशोक थकेरिया, आनंद पंडित व कुमार मंगत पाठक यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, टी सीरिज व देवगण फिल्म्सच्या वतीने हा चित्रपट सादर केला जात आहे.

# आकांक्षा आणि शरण लवकरच बोहल्यावर



**नेटफ्लिक्सवरील** ‘गिल्टी’ आणि ‘मोनिका ओ माय डार्लिंग’ यांसारख्या प्रकल्पांमधील भूमिकांसाठी ओळखली जाणारी आकांक्षा आणि ‘गुंजन सक्सेना: द कारगिल गर्ल’ व ‘मिस्टर अँड मिसेस माही’ या चित्रपटांचे दिग्दर्शन करणारा शरण हे गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत आहेत. त्यांनी आपले वैयक्तिक आयुष्य नेहमीच प्रसिद्धी माध्यमांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला असला तरी आता त्यांच्या लग्नाची तारीख समोर आली आहे. येत्या ११ जुलै रोजी त्यांचा विवाहसोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर पुढच्याच दिवशी म्हणजेच १२ जुलै रोजी रिसेप्शनही आयोजित करण्यात आले आहे. या सोहळ्याला केवळ कुटुंबातील सदस्य आणि अत्यंत जवळचे मित्रपरिवारच उपस्थित राहणार आहेत. वैयक्तिक आयुष्याला नेहमीच प्राधान्य देणाऱ्या या जोडप्याच्या लग्नाची सिनेवर्तुळात सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे.

# उत्सुकता हुमाच्या ‘बेबी’ची

**अभिनेत्री** हुमा कुरेशी मुख्य भूमिकेत असलेला ‘बेबी दो डाय दो’ या चित्रपटाचा बहुप्रतिक्षित टीझर अखेर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात हुमा कुरेशी ‘बेबी करमरकर’ नावाच्या एका अनोख्या व्यक्तिरेखेत दिसणार असून, तिला भारताची पहिली ‘देशी महिला शार्पशूटर’ किंवा ‘हिटवुमन’ म्हणून सादर करण्यात आले आहे. मुंबईच्या पार्श्वभूमीवर बेतलेला हा चित्रपट रहस्य, थरार आणि काहीशा उपरोधिक विनोदाने परिपूर्ण असणार आहे. प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये बेबी करमरकरच्या लहानपणापासूनच्या प्रवासाची काहीशी झलक पाहायला मिळते, मात्र तिच्या रहस्यमयी पात्राबद्दलचे अनेक तपशील अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहेत. टीझरमध्ये मुंबईच्या गजबजलेल्या वातावरणात हातामध्ये लाल छत्री घेऊन फिरणारी एक गूढ महिला दाखवली आहे, जी प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करते.

या चित्रपटात हुमा कुरेशीसोबत सिकंदर खेर, चंकी पांडे, सीमा पाहवा, रचित सिंग आणि मरुधर शेखावत यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन नचिकेत सामंत यांनी केले असून, अभिनेता साकिब सलीम याने त्याच्या ‘सलीम सिब्लिंग्स’ या निर्मिती संस्थेद्वारे ‘पुणे ०४ फिल्म्स’च्या सहकार्याने याची निर्मिती केली आहे.



# चर्चा एका भेटीची

**अभिनेते** अविनाश तिवारी आणि चित्रपट दिग्दर्शक शुजात सौदागर यांच्यात नुकत्याच झालेल्या एका भेटीमुळे मनोरंजन विश्वात नव्या प्रकल्पाच्या चर्चांना उधाण आले आहे. या दोन्ही दिग्गजांनी अद्याप या भेटीच्या मुख्य कारणावर भाष्य केले नसले तरी, चित्रपट वर्तुळात त्यांच्या आगामी संभाव्य भागीदारीबद्दल तर्कवितर्क लावले जात आहेत.

अविनाश हा शुजात सौदागर यांच्या अत्यंत गाजलेल्या ‘बंबई मेरी जान’ या गुन्हेगारी जगतावर आधारित वेबमालिकेच्या दुसऱ्या भागात झळकण्याची शक्यता आहे. पहिल्या भागातील उत्कृष्ट कथानक आणि प्रभावी कामगिरीनंतर या मालिकेचा पुढचा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याची चर्चा रंगत आहे. दुसरीकडे, शुजात सौदागर यांच्या आगामी ‘जेसी’ (जेकब कार्डोझो) या चित्रपटात अविनाश हा एक विशेष पाहुणा कलाकार म्हणून दिसू शकतो, असाही एक अंदाज व्यक्त केला जात आहे.



सध्या या सर्व चर्चा केवळ प्राथमिक अंदाजांवर आधारित असून प्रेक्षकांमध्ये आणि चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे.

# कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकरांनी केंद्रीय नितीन गडकरी यांची भेट घेतली

■ नवी दिल्ली

**कोल्हापूर** जिल्ह्याच्या वाहतूक सुविधांच्या उन्नतीसाठी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली.

यावेळी प्रकाश आबिटकर यांनी राज्य महामार्गावरील मुदाळतिठ्ठा येथे उड्डाणपूल उभारणीसाठी केंद्रीय राखीव निधीअंतर्गत मंजुरी, संकेश्वर-आजरा राष्ट्रीय महामार्गावरील विद्यमान टोल नाका स्थलांतरित करणे व गारगोटी- कोल्हापूर रस्ता दुरूस्तीसाठी निधीची मागणी नामदार गडकरी यांच्याकडे केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कोल्हापुर जिल्ह्यातील रस्ते विकास व वाहतूक सुविधा उन्नतीसाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. भुदरगड तालुक्यातील आदमापूर येथील सद्गुरु संत बाळूमामा यांच्या पवित्रस्थळी दरवर्षी लाखो भाविक महाराष्ट्र, कर्नाटकसह विविध राज्यांतून येतात. त्यामुळे कोल्हापूर-गारगोटी मार्गावरील मुदाळतिठ्ठा परिसरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. या पार्श्वभूमीवर राज्य महामार्ग क्रमांक १८९ वर मुदाळतिठ्ठा येथे उड्डाणपूल उभारण्याची मागणी पालकमंत्री आबिटकर यांनी केली. उड्डाणपूलामुळे भाविक, स्थानिक नागरिक, मालवाहतूक यांना मोठा दिलासा मिळेल.

# मुंबईतील फेरीवाल्यांना आजपासून क्यूआर कोड ओळखपत्र वाटप



■ मुंबई

**मुंबईतील** अधिकृत फेरीवाल्यांसाठी आजपासून क्यूआर कोडयुक्त ओळखपत्र वाटप सुरू केले आहे. सुमारे १२ वर्षांनंतर फेरीवाला सर्वेक्षणानंतर ही प्रक्रिया प्रत्यक्षात येत आहे. यामुळे फेरीवाल्यांची ओळख, परवाना आणि नोंदणीची माहिती तत्काळ पडताळता येणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे शहरातील फेरीवाला व्यवस्थेत मोठा बदल अपेक्षित असून पुढील काही दिवसांत संपूर्ण वाटप प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

महानगरपालिकेने पुढील १० दिवसांत ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. २०१४ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात १,२८४४३ अर्ज वाटप केले होते. त्यापैकी ९९,४३५ अर्ज पालिकेकडे दाखल झाले. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याच सर्वेक्षित फेरीवाल्यांना क्यूआर कोड ओळखपत्र देण्यात येणार आहे. मात्र, पडताळणीनंतर ३२,४१५ फेरीवाले पात्र ठरल्याची माहिती यापूर्वी विधानसभेत दिली होती. सध्या आणखी सुमारे २९ हजार अर्जदारांची पात्रता पडताळणी सुरू आहे तर शहरात प्रत्यक्षात सुमारे ३.२६ लाख फेरीवाले व्यवसाय करत असल्याचा उल्लेख न्यायालयाने केला. या क्यूआर कोड मोहिमेमुळे अधिकृत आणि अनधिकृत फेरीवाल्यांमध्ये स्पष्ट फरक करणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

# ठाण्यात वृद्धाला मारहाण शिवसैनिकांचा आरोपीला चोप

■ ठाणे

**ठाण्यातील** ज्युपिटर रुग्णालयाबाहेर किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून परप्रांतीय ओला चालकाने वृद्ध नागरिकाला बेदम मारहाण केली. या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल होताच संबंधित चालकाला शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या शिवसैनिकांनी शोधून चोप देऊन वर्तकनगर पोलिसांच्या ताब्यात दिले.

काल संध्याकाळी ज्युपिटर रुग्णालयाबाहेर ओला चालकाचा आणि वृद्ध व्यक्तीचा किरकोळ कारणावरून वाद झाला. वृद्ध व्यक्तीने चालकाला कचरा टाकू नको असे सांगितले. मात्र त्याने त्या वृद्धाशी वाद घालत मारहाण केली, खाली ढकलले. त्याच्यासोबत असलेली त्याची वृद्ध पत्नी त्याला वाचवायचा प्रयत्न करत होती. मात्र संतापलेला चालक त्याला आणखीच मारत होता, त्याला शिवीगाळही करत होता. हा प्रकार उपस्थित नागरिकांनी मोबाईलमध्ये कैद केला.हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर उबाठाचे सुमित बोराडे आणि शिंदे गटाचे नितेश पाटोळे या दोघांनी ओला चालकाचा शोध घेऊन त्याला चोप दिला.

# सिंधुदुर्ग बांधकाम विभागात १३ बिलांवर बनावट सह्या

## कठोर कारवाई करणार

■ कणकवली

**सिंधुदुर्ग** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामधील कार्यकारी अभियंत्यांच्या १३ बिलांवर बनावट सह्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. या १३ पैकी एका बिलाची ६ लाख ७५ हजारांची रक्कम ठेकेदाराला अदाही झाल्याने खळबळ उडाली. याप्रकरणी कुणालाही पाठीशी घातले जाणार नाही. जो कोण दोषी आढळेल त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा परिषदेचे अध्यक्ष प्रमोद कामत यांनी दिला.

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर यांचीही याप्रकरणी चौकशी करण्यात आली. एका व्यक्तीवर जबाबदारी निश्चित केली. त्या व्यक्तीविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी आपण दिली असल्याची माहिती कामत यांनी पत्रकारांना दिली. एकूण १३ बिलांपैकी ६ लाख ७५ हजार रुपयांचे बिल हे एका कामाचे रनिंग बिल होते. ही सर्व बिले पाच ठेकेदारांची आहेत. त्यात १२ बिले अनामत रक्कम अदा करण्यासंबंधी होती. परिषदेमध्ये बिले मंजूर करून घेण्यासाठी ठेकेदारांना मदत करणाऱ्या व्यक्तीने या बोगस सह्या केल्या असाव्यात असा प्राथमिक अंदाज आहे. या व्यक्तीविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंता यांना मे महिन्याच्या १८ तारखेलाच दिली आहे.

# बीडमध्ये गोदावरीत बोट उलटली दोन महिला भाविकांचा मृत्यू

■ बीड

**माजलगाव** तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी येथे गोदावरी नदीत आज सकाळी ११ वाजता भाविकांची बोट उलटली. या दुर्घटनेत २ महिला भाविकांचा बुडून मृत्यू झाला असून, एक वृद्ध महिला गंभीर जखमी झाली. तर काही अन्य भाविक जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

अधिक मासानिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी आणि गोदावरी स्नानासाठी येत आहेत. नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीरावर जाण्यासाठी बोटींची व्यवस्था करण्यात आली. याच बोटीचा अपघात घडला. या घटनेनंतर किनाऱ्यावर उपस्थित असलेल्या स्थानिक मच्छीमार आणि तरुणांनी नदीत उड्या घेत बचावकार्य सुरू केले. या दुर्घटनेत २ महिलांचा मृत्यू झाला तर सिंधुबाई मावळे (७५) या जखमी असून त्यांच्यावर माजलगाव येथील खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

# अमरावती विधानपरिषदेचे काँग्रेसचे गायब उमेदवार देशमुख रुग्णालयात

■ अमरावती

**अमरावती** विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे अधिकृत उमेदवार हर्षजीत देशमुख अचानक प्रचारातून गायब झाल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले होते. मात्र, देशमुख हे नागपूरमधील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

निवडणुकीचा प्रचार ऐन रंगात असतानाच देशमुख रुग्णालयात दाखल झाल्याने त्यांच्या माघारीच्या चर्चा रंगल्या होत्या. विशेष म्हणजे, त्यांच्यावर निवडणुकीतून माघार घेण्यासाठी दबाव असल्याचीही चर्चा होती. तसेच ते वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा देणार असल्याचेही बोलले जात होते. दरम्यान, देशमुख यांच्यावर अँजिओप्लास्टी होणार असल्याची माहिती आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळेच रुग्णालयात दाखल झालो असून इतर कोणतेही राजकीय कारण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, मी निवडणुकीतून माघार घेतलेली नाही. माझा कार्यकर्त्यांशी संपर्क सुरू आहे. माझ्यावर कोणाचाही दबाव नाही.



# नवी मुंबईत शिंदे गटाचे वीज कपातीविरोधात आंदोलन

■ नवी मुंबई

**नवी मुंबईत** सातत्याने होत असलेल्या वीज कपातीमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या प्रश्नांसाठी शिंदेंच्या युवासेनेने आज वाशी येथील महावितरण (एमएसईबी) कार्यालयावर हल्लाबोल आंदोलन केले.

गेल्या काही दिवसांपासून वाशी, ऐरोली, कोपरखैरणे, घणसोली आणि आसपासच्या परिसरात वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर वाढीव वीज बिल आणि लोडशेडिंगच्या समस्येविरोधात युवासेना आक्रमक झाली आहे. शिवसेना नगरसेवक अनिकेत म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी महावितरण कार्यालयावर धडक देत जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनकर्त्यांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत वीजपुरवठा सुरळीत करण्याची आणि वाढीव बिलांबाबत तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली.

# चंद्रपूरच्या वर्धा नदीत पोहताना ५ मित्रांचा पाण्यात बुडून मृत्यू

## बचाव पथकाला मृतदेह बाहेर काढण्यात यश

■ चंद्रपूर

**उकाड्यापासून** दिलासा मिळावा म्हणून जिल्ह्यातील घुग्गुस शहराजवळच्या वर्धा नदीत पोहण्यासाठी गेलेल्या ५ मित्रांचा एकाचवेळी बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

दुपारच्या सुमारास घुग्गुस शहराजवळ म्हातारदेवीसमोरील चांदूर गावाजवळ वर्धा नदीकाठी इंदिरानगर परिसरात राहणारे नकुल केळझकर (२०), तन्मय पथाडे(२०), सम्यक सोनटक्के (१९), सन्नी आसपेल्ली(१७) आणि रोहित बोबडे (१७) हे ५ मित्र पोहण्यासाठी गेले होते. नदीकाठी कपडे ठेवून सर्वजण पाण्यात उतरले. पण नदीतील खोलीचा पाण्याचा अंदाज न आल्याने पाचही जण पाण्यात बुडाले. सायंकाळ झाली तरीही ते घरी परत न आल्याने पालकांनी त्यांचा शोध सुरू केला. नदीच्या काठावर मुलांचे कपडे आणि मोबाईल आढळल्याने शंका बळावली.

या घटनेची संपूर्ण माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. बोटीच्या मदतीने रात्रभर शोधकार्य करण्यात आले. पावसामुळे शोधमोहिमेत अडथळे निर्माण झाल्याने ती तात्पुरती थांबवावी लागली. काल मंगळवारी सकाळपासून पुन्हा शोधमोहिम सुरू करण्यात आली. तेव्हा सकाळी सुमारे १० वाजता तन्मय पथाडेचा मृतदेह सापडला. त्यानंतर संध्याकाळपर्यंत उर्वरित चारही मृतदेह शोधण्यात बचाव पथकाला यश आले.


# पाकिस्तानचे अफगाणिस्तानवर पुन्हा हवाई हल्ले! ११ चिमुरड्यांसह १३ ठार

■ कराची

**पाकिस्तानने** अफगाणिस्तानवर पुन्हा एकदा हवाई हल्ले केल्याची माहिती हाती आली आहे. या हल्ल्यात ११ चिमुरड्यांसह १३ जण ठार आणि १४ जण जखमी झाले आहेत. तालिबानचे मुख्य प्रवक्ते झबिहुल्ला मुजाहिद यांनी याविषयी बोलताना म्हणाले की, हे हवाई हल्ले अफगाणिस्तानच्या खोस्त, कुनार आणि पक्तिका या प्रांतांना लक्ष्य करून करण्यात आले.

पाकिस्तानने केलेल्या या हल्ल्यात मृत्यू पावलेल्यांमध्ये ११ मुले, एक महिला आणि एका वृद्ध व्यक्तीचा समावेश आहे. पाकिस्तानने अद्याप या हल्ल्यांची कबुली दिलेली नाही. हल्ल्यांची तीव्रता आणि कारण तात्काळ कळू शकले नाही. पाकिस्तानचा हा हल्ला दोन्ही देशांमधील अनेक महिन्यांच्या तणावानंतर झाला आहे. फेब्रुवारीच्या अखेरीपासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये अनेक हल्ले झाले असून, त्यात शेकडो लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर चीनने मध्यस्थी करून तात्पुरती शस्त्रबंदी घडवून आणली होती.

# नवाकाळ शब्दकोडे-१६३३



**आडवे शब्द –**

२. जगदंबा, पार्वती ४. जळून खाक ८. सारवासारवी ११. रामाने बालपणी वध केलेली राक्षसी १२. रत्नाकर, दर्या १३. पडताळणी १५. चंद्राची कला; मुलींचे एक नाव १८. पायी फिरून दमणूक २०. अति लाडांनी बिघडलेला २४. जिवंतिका २६. पंजाबमधली एक नदी, परुष्णी २७. वजनदार २८. गणपतीच्या पूजेतील तृण २९. पान्यापासून तयार केलेले ३०. थेऊरचा गणपती ३२. कबर ३४. रिकामा, मोकळा ३५. उंट हाकणारा ३६. जाड आवरण, चिलखत ३८. रुची, आवड ४०. खालचा भाग, बुडाचा भाग ४१. कमळाच्या बियांचा पदार्थ ४२. कुटुंबात चालत आलेल्या धार्मिक प्रथा ४३. ओळ, रांग ४५. कलंक, काळिमा ४६. कष्टाळू, कामाची आवड असलेला ४८. छळ ४९. पांडवांची आई ५०. समीप, सन्निध ५२. झुकवणे, वाकवणे ५४. पुण्याजवळील एक दुर्ग ५६. आवेश, जोश ५८. फूल, पुष्प ६०. मैत्रीण, सखी ६१. लिखाण ६३. गुपित ६४. चोप ६५. अंमलबजावणी ६६. विचारविनिमय ६७. सावध होणे, लक्षपूर्वक ऐकणे ६८. सैनिकांची परेड ७०. प्रवास ७२. रोजगार नसलेला ७४. कपाळभर लावलेले कुंकू ७६. चाकाचा कणा ७७. तपासणी करणारा अधिकारी ७९. भक्कम लाकडाचा प्रकार ८१. भ्रमराची गुणगुण ८३. सोने ८५. औषधी अर्क, कषाय ८६. पक्ष्यांचे पीस ८७. वेल; मुलींचे एक नाव ८९. रमणीय ९०. बाण, तीर ९१. प्रामाणिक, निष्पाप ९३. नोकर, सेवक ९४. पाठ म्हणणे, आवर्तन ९५. नासिका, नासा ९६. माज ९७. शाश्वत, कायम ९९. चप्पल १०१. पोळीचा एक पर्याय १०३. इतरांहून निराळे, नामी १०४. नित्य, नेहमी १०५. पडदा १०६. नीट न शिजलेले अर्धकच्चे अन्न १०७. कापसाचे बी

**उभे शब्द –**

१. बूज, किंमत, आदर २. गगन ३. अमली, नशा आणणारे ४. देवी ५. आठवण ६. युवक, युवा ७. काड्या घालणे, भांडण लावणे ९. माशाच्या पाठीवरील ओबडधोबड भाग १०. गलबताचे कापड १४. चीर, भेग १६. डोके, मस्तक १७. लज्जास्पद १९. अफवा, वावडी, कंडी २१. व्यक्तीला अंकित करण्यासाठीचा कथित जादूटोणा २२. संकोची स्वभावाचा २३. गणेश चतुर्थीच्या आधीचे व्रत २५. चेहरा २६. राज्यसुख, राजेपद २८. हिरवा २९. वंचित, मुकलेला ३०. अरुंद ३१. कानातल्या दागिन्यांपैकी एक ३३. प्रवासी वाहतुकीचे मोठे वाहन ३५. निर्जन जागेवरची शांतता ३७. खंदक ३९. टाळाटाळ, चालढकल ४२. अंगचोरपणा, काम टाळणे ४४. वृष्टी, भडिमार ४५. खेळ; मनातला आकस; मोठी पळी ४७. चिंतन ५०. माणसे ५१. वसंत ऋतू ५३. पेठ, मोहल्ला ५५. पाण्यात राहणारा प्राणी ५६. निरंतर, सतत ५७. सासरी होणारा छळ ५९. एक सुगंधी वनस्पती, गंधतुलसी ६०. घोड्यांची निगा राखणारा सेवक ६२. भांडण ६५. पाषाण ६९. कवितेतील मुख्य अलंकार ७१. सरशी ७२. छोटी नथ ७३. सलगी ७५. सरपण विक्रीचे दुकान ७६. रुग्णावस्था ७८. मूळ; कानाची कड ७८अ. नीहार ७९. चंचल मन ८०. नावाची पाटी ८२. चौरस शाकाहारी जेवणातले दोन पदार्थ ८४. रताळी, बटाटे वगैरेपासून मिळणारे घटक, कार्बोहायड्रेट्स ८५. अस्वस्थ, व्याकूळ ८६. साडीचा शेव ८८. जहाजातून आयात केलेला माल ९०. वर्ष, साल ९२. सुचवलेले, अप्रत्यक्षपणे सांगितलेले ९३. प्रथा ९५. महिला ९६. उसळीचे लोकप्रिय धान्य ९८. कासोटा १००. त्रास १०२. कैवार १०३. प्रत्येक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६३२ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. वन ३. कलंकित ६. वाचाळ ९. संपदा ११. पर्णकुटी १३. दावा १५. वृषभ १७. मालक १८. नल २०. चाकोरीबद्ध २२. रहदरी २३. पेला २५. सदा २७. रदन २८. त्वरित ३०. परिचय ३३. वेखंड ३६. विमल ३८. रामरक्षा ४०. जमदाड ४२. बाशिंगबळ ४४. बोटाच्या टोकाकडचा कडक भाग ४५. वसवा ४६. मनधरणी ४७. कडवा ४९. गुहा ५०. खोगीर ५१. समारंभ ५३. संदल ५५. ललिता ५७. वपा ५९. वही ६०. हाटक ६१. गदा ६३. वडीलधारा ६४. वाकडा ६६. तहान ६८. रीमा ७०. लपेट ७१. हव्यास ७३. शनी ७५. तपन ७७. वक्ष ७९. वई ८०. माधव ८१. गाणे ८२. सुधांशू ८४. पसंत ८५. वातायन ८७. भरधाव ९०. तरतरीत ९२. रवा ९३. मग्न ९४. सत्ताधारी ९६. थाट ९८. तावदान १०१. झोपा १०३. घरोबा १०४. हवासा १०५. सोलकढी १०७. ताव १०९. गुलछडी ११०. फक्त १११. लगत ११२. शहाणीव ११३. चारू

**उभे शब्द** : १. वर्णमाला २. नकुल ४. लंडन ५. तदा ७. चालरीत ८. रोष १०. पडदानशीन १२. टीक १४. वाचा १५. वृद्धत्व १६. भरत १९. लस २१. कोदंड २३. पेहराव २४. जाच २६. दावेदार २९. रिकीब ३०. परवा ३१. रिक्षा ३२. यजन ३४. खंडणीखोर ३५. वशिंड ३६अ. मन ३७. लखलाभ ३९. मसनद ४१. मध ४२. बाकरवडी ४३. गवार ४६. महालकरी ४८. सीमा ५१. सही ५२. रंजक ५३. संपत शनिवार ५४. लहान ५६. ताग ५८. पालखी ५९. वराह ६२. दालन ६३. वटवणे ६४. वास ६५. डाकाईत ६७. हानी ६९. मात ७२. व्याधी ७४. बंधन ७६. पहार ७८. अधांतरी ७९. वसंत ८०. माय ८१. गाव ८३. शूर ८४. परीट घडीचा ८६. तावातावाने ८७. भग्न ८८. धास्ती ८९. लत्ता ९१. तथा ९३. मनसोक्त ९४. सपाता ९५. धागा ९७. दबाव ९९. वसा १००. सकल १०२. पालव १०६. ढीग १०८. वश १०९. गुणी

# मेटा आणि रिलायन्स जामनगरमध्ये पहिले एआय डेटा सेंटर उभारणार

पान १ वरून

अर्थव्यवस्थेतील आमच्या दीर्घकालीन गुंतवणुकीला अधिक दृढ करण्यास मदत करेल. मेटा आपल्या वाढत्या एआय गरजा पूर्ण करण्यासाठी आपली क्षमता वाढवण्यावर गुंतवणूक करत आहे. झकरबर्गने 'मेटा कंप्यूट' नावाच्या एका उच्चस्तरीय उपक्रमाद्वारे या दशकात 'दशकांचे गिगावॉट' आणि पुढे जाऊन 'शेकडो गिगावॉट' किंवा त्याहून अधिक क्षमता निर्माण करण्याची योजना आखली आहे.

साध्या डेटा सेंटर्सचा वापर केवळ डेटा साठवण्यासाठी आणि प्रक्रिया करण्यासाठी केला जातो. याउलट, एआय-पॉवर्ड डेटा सेंटरमध्ये विशेष लिक्विड कूलिंग सिस्टम आणि उच्चशक्तीचे ग्राफिक प्रोसेसिंग युनिट बसवलेले असतात. हे मशीन लर्निंग, डीप लर्निंग आणि चॅटबॉट्ससारख्या अवजड आणि जटिल आर्टिफिशियल इंटेलिजन्स अल्गोरिदमवर अत्यंत वेगाने प्रक्रिया करण्याची क्षमता ठेवतात.

# दादांची पोकळी जाणवते! सुनेत्रा पवारांची भावनिक पोस्ट

पान ८ वरून

आजच्या दिल्लीतील कार्यक्रमानंतर उद्या मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात मुख्य वर्धापनदिन सोहळा पार पडणार आहे.

सुनेत्रा पवार यांनी एक्सवर लिहिले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्षातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांना शुभेच्छा आहेत. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या लोकाभिमुख राजकारणाच्या पायावर उभा असलेला हा पक्ष २७ वर्षांचा प्रवास पूर्ण करत आहे. या प्रवासात जनता व कार्यकर्त्यांची साथ हीच खरी ताकद आहे. पण यंदाचा वर्धापनदिन साजरा करताना मनात एक वेगळीच भावना दाटून येते. कारण आज आदरणीय अजितदादा आपल्यात नाहीत. सभागृहात भाषणे होतील, कार्यकर्त्यांचे मेळावे होतील आणि पक्षाचा झेंडा अभिमानाने फडकेल, पण दादांची पोकळी प्रत्येक क्षणी जाणवत राहील. दादा हे केवळ नेते नव्हते तर कार्यकर्त्यांचा आधारवड होते. सुख-दुःखात धावून जाणारे, संकटात पाठीशी उभे राहणारे आणि माणुसकीला केंद्रस्थानी ठेवणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रत्येकाच्या आठवणीत कायम आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापनदिनी दादांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार करून शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी मार्गावर चालत अधिक सक्षम, समृद्ध महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करूया.

# मुंबईत २५ लाखांची नोकरी! पण मराठी नकोत

पान १ वरून

कंपन्यांना विविध पदांवर त्यांच्या गरजेनुसार पद भरायची असतात. एखाद्या कंपनीला एखाद्या विशिष्ट जागेसाठी त्या भाषेत ज्ञान असलेली व्यक्ती हवी असेल, त्यानुसार रिक्रुटमेंट कंपनीकडून जाहिरात दिली जाते. आमच्याकडे येणाऱ्या कंपन्यांमध्ये कोणत्याही एका जातीची किंवा भाषेची व्यक्ती काम करत नाही. विविध भागातून आलेले विविध भाषा बोलणारे लोक कंपन्यांमध्ये काम करतात. त्यामुळे या जाहिरातीचा वेगळा अर्थ घेऊ नये, कंपन्यांच्या गरजेनुसार त्या पदासाठी भाषेची गरज पाहून तशा प्रकारची जाहिरात दिली आहे.

२०२४ मध्ये गिरगाव परिसरातही एका खासगी कंपनीच्या जाहिरातीत 'मराठी उमेदवारांनी अर्ज करू नये' असा स्पष्ट उल्लेख करण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. एचआर जान्हवी सराना या नावाने लिंक्डिनवर एक जाहिरात करण्यात आली होती. ही जाहिरात व्हायरल झाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात संताप व्यक्त झाला होता. नेटकऱ्यांनी लिंक्डइनसह सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरती ट्रोलिंग केल्यानंतर एचआर कंपनीने आपली पोस्ट डिलीट केली होती.


**सार्वजनिक नोटीस**

मुंबई सिटी सिव्हिल न्यायालय, मुंबई
**Guardian Petition No. 100154 / 2025** कोर्ट रूम क्र. **4**

**वादी :**
१. ज्ञानोबा हरिभाऊ वाघ
२. तारामती ज्ञानोबा वाघ

**प्रतिवादी :**
१. सोनू रघुनाथ वाघमारे
२. गौतम रघुनाथ वाघमारे

सदर प्रकरणामध्ये ज्या कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप असेल, त्यांनी दि. १२/०६/२०२६ रोजी संबंधित न्यायालयात स्वतः किंवा त्यांच्या अधिवक्त्यामार्फत उपस्थित राहून आपला दावा किंवा आक्षेप मांडावा. अन्यथा, त्यांच्या अनुपस्थितीत उपलब्ध नोंदींवरून कायद्यानुसार योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सही/-
**Kavita Rathod**
B.Com.. LL.B. I.L.M.
**ADVOCATE HIGH COURT BOMBAY**
Shop No. 16, C.G. Road,
Opp. Jhama Sweets, Chembur Camp,
Chembur (E), Mumbai- 400074.
**Mobile 9820109477 / 9324226227**


# काँग्रेसच्या दुष्टचक्रातून देशाला मुक्त केले हे एनडीएच्या १२ वर्षांच्या सत्तेचे यश! मोदींचे प्रतिपादन

पान १ वरून

झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्र्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या स्वागतासाठी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. तसेच त्यांच्या या विक्रमी कामगिरीबद्दल एक विशेष ठरावही मंजूर करण्यात आला.

संध्याकाळी भारत मंडपम येथे 'भारत मंडपम' येथे आयोजित एनडीएची बैठक पार पडली. यावेळीही पंतप्रधान पदावरील ४,३९९ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. या निमित्ताने भाषण करताना ते म्हणाले की, पंतप्रधानपदावर सर्वाधिक काळ पूर्ण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींचा 'भारत मंडपम' येथे झालेल्या एनडीएच्या बैठकीत सत्कार करण्यात आला. त्यावेळी मोदींनी या बैठकीत देशवासियांना सांगितले की, भारतात गतीने विकास करणे शक्यच नाही, असे काँग्रेसकडून भासवले जात होते. या हळूहळू विकासाला हिंदू ग्रोथ रेट असे नाव दिले होते. ही कार्यशैली काँग्रेसची होती, अपयश काँग्रेसचे होते, उत्तरदायीत्व काँग्रेसचे होते. परंतु कलंक मात्र देशातील हिंदू लोकसंख्येवर लावण्यात आला. काँग्रेस सत्तेत असताना सरकार नव्हते, नीती नव्हती, विचार नव्हता. अटल बिहारी यांच्या नेतृत्वात पहिल्यांदाच एनडीए सरकार आले. एनडीएचे सरकार पहिल्यांदा आल्यानंतर विकासात गती कशी येते, हे आपल्याला पाहायला मिळाले. परंतु दुर्दैवाने २००४ साली देश पुन्हा अस्थिरतेच्या वादळात आणि काँग्रेसच्या सत्तेत फसून गेला. काँग्रेस पुन्हा सत्तेत आल्यानंतर देशाला हजारो, कोटी रुपयांच्या घोटाळ्यात ढकलून दिले. काँग्रेसच्या विश्वासघातानंतर देशातील जनतेने एनडीएवर विश्वास दाखवला आणि आमच्या आघाडीने त्या विश्वासाला अधिक बळकट करण्याचे काम केले आहे. मला समाधान आणि अभिमान वाटतो की, एनडीएने एक कुटुंब म्हणून देशाचा विश्वास नेहमीच दृढ केला. २०१४ मध्ये आशेचा जो सूर्योदय झाला होता, तो आज नव्या आत्मविश्वासाच्या किरणांमध्ये परिवर्तित झाला आहे.

आज दुपारी १२.३० वाजता झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्र्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या स्वागतासाठी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. तसेच त्यांच्या या विक्रमी कामगिरीबद्दल एक विशेष ठरावही मंजूर करण्यात आला.

## पंतप्रधानपदाचा सन्मान, पण नेहरू हे नेहरूच होते! शरद पवारांचे विधान

पान १ वरून

राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. धोरणांवर मतभेद असू शकतात, टीका होऊ शकते, पण पदाचा अनादर होता कामा नये. नेहरूंची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही. नेहरू हे नेहरूच होते. काही लोक सतत असे सांगण्याचा प्रयत्न करत आहेत की देशाच्या उभारणीत नेहरूंचे काही योगदान नव्हते. पण हा इतिहासाचा अपमान आहे. नेहरूंचे देशासाठीचे योगदान कोणीही नाकारू शकत नाही. देशाच्या प्रतिष्ठेशी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. आज देशात असे चित्र आहे की, शेतकरी खतासाठी रांगेत उभे आहेत, बेरोजगारी वाढत आहे, आदिवासी, महिला आणि अल्पसंख्याकाचे प्रश्न गंभीर आहेत. पण ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांना या प्रश्नांबाबत किती आस्था आहे, यावर भाष्य न केलेले बरे, नवीन व्यवस्था तयार करायची आहे. राष्ट्रवादी स्वस्थ बसणार नाही, सर्व सामान्यांच्या प्रश्नासाठी राष्ट्रवादी शरद पवार गट रस्त्यावर उतरणार आहे, असा निर्धारही पवार यांनी व्यक्त केला.


**PUBLIC NOTICE**

I, **Tushar Kumar Vyas s/o of** Natvarlal Vyas, residing at B-802, Kesar Ashish, Link Road, Kandivali West, Mumbai-67, declare that "**Tushar Natavarlal Vyas**" and "**Tushar Kumar Vyas** " are the names of the same person and the correct name is '**Tushar Kumar Vyas**' as sworn vide Affidavit dated 10.06.26 before the Notary, Mr. Nimesh Mehta, Mumbai.



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to General Public at large that my client Mr. Dipak Kishor Mehta, Mrs. kala Dipak Mehta and Mrs. Isha Hemil Parikh all an adult Indian inhabitant (hereinafter referred to as "my client") has entered into purchase of One Flat with Mr. Deepak Chandrakant Jhaveri and Mrs. Bina Deepak Jhaveri both an adult Indian inhabitant (hereinafter referred to as "other party") which has been situated at Ashok Gardens Co-Op Housing Society Ltd., having Reg. No. MUM/WF/S/HSG/TC/9212/2013 dated 27.06.2013,"F" Wing, Flat No. 1704, 17th Floor, Tokersey Jivraj Road, Sewri (West), Mumbai 400 015, Maharashtra State along with one allocated car parking No. "G" Level, No. 1610 also said society issued 10 shares having Sr. No. 517, Share Certificate No. AG/F/517 in favour of Mr. Deepak Chandrakant Jhaveri and Mrs. Bina Deepak Jhaveri and as per Flat details mentioned below in Schedule of the Property.

Any person/s having any share, right, title, interest, claim or demand against or to the property mentioned in Schedule whether by way of development right, sale, assignment, charge, gift, Exchange, Encumbrance, lease, tenancy, license, mortgage, lien, transfer, trust, easement order/decree/Judgment of any court, option agreement or any kind of Agreement or understanding or otherwise whatsoever in, to or upon the said Flat of any part thereof are hereby required to give Notice of the same in writing along with supporting documentary Evidence/proof based on which such claim is being raise, to the undersigned at Parekh Mahel, 6th Floor, "A" Wing, Veer Nariman Road, Churchgate, Mumbai 400020 within 14 ( fourteen) days from the date hereof, after which, any such right, claim or demand, if any, shall be considered as waived and abandoned.

**THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO :**

RESIDENTIAL Flat which has been situated at Ashok Garaden "F" Wing, Flat No. 1704, 17th Floor, Tokersey Jivraj Road, Sewri (West), Mumbai 400 015 Maharashtra State admeasuring 701 sq, feet carpet area i.e., 65.13 sq. Mtrs. area equivalent to 841 sq. feet built up area i.e. 78.13 sq. Mtrs. area along with one allotted car Parking No." G" Level, No. 1610, bearing Cadastral Survey No. 180,188,206, 1/207,2/207 of Parel Sewri Division, Tokersey Jivraj Road, Sewri, Mumbai 400 015 together with 10 (Ten) Shares of face value of RS. 50/- (Rupees Fifty only) each of the aggregate value of Rs. 500/- (Rupees Five Hundred Only) bearing distinctive Nos. 5161 to 5170 (both inclusive) under the share certificate No. AG/F/517 dated 13th February, 2014 issued by the Ashok Garden Co-Operative Housing Society Ltd, together with exclusive right to use one car parking space No." G" Level, No. 1610.

Place: Mumbai
Date : 11-06-2026

Sd/-
Advocate Jayant Wani.


# दिल्लीनंतर पुणे! कॉकरोचचे आज आंदोलन त्यानंतर लखनौ, जयपूर, बंगळुरू! देशभर आक्रोश

पान १ वरून

गोंधळामुळे तब्बल १ कोटीहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. असे असतानाही, सरकारमधील कोणीही याची जबाबदारी घेण्यास तयार नाही. या संपूर्ण अपयशाला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान हेच जबाबदार असून त्यांनी तातडीने राजीनामा द्यायला हवा. या मागणीसाठी पुण्यात उद्या दुपारी चार वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात शांततेच्या मार्गाने आंदोलन करणार आहोत. त्यानंतर लखनौ,अमृतसर,जयपूर आणि बंगळुरु या शहरांमध्ये आंदोलन केले जाईल. तरीही शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर २० जून रोजी जंतरमंतरवर पुन्हा आंदोलन केले जाईल. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्यशिवाय मी हटणार नाही.

अभिजीत दीपके पुढे म्हणाला की, देशातील तरुणांचा आणि विशेषतः विद्यार्थ्यांचा सर्वच राजकीय पक्षांवरील विश्वास उडाला आहे. त्यांच्याकडून काही चांगले घडेल, अशी अपेक्षा करणेच त्यांनी सोडून दिले आहे, हे आमच्या जंतरमंतरवरील आंदोलनातून स्पष्ट झाले. संपूर्ण जंतरमंतर विद्यार्थी आणि तरुणांनी फुलून गेले होते. सीजेपी हे आपल्याला मिळालेले भरवशाचे व्यासपीठ आहे, असा विश्वास तरुणांमध्ये निर्माण झाला आहे. त्यामुळे आता माघार घेण्याचा प्रश्नच येत नाही. उद्याचे पुण्यातील आंदोलन जंतरमंतरपेक्षाही मोठे असेल. कॉकरोच जनता पार्टीची कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी नाही. मात्र, तरुणांच्या प्रश्नांवर कोणाला आम्हाला समर्थन द्यायचे असेल तर स्वागत आहे. एका राजीनाम्याने व्यवस्था बदलणार नाही, याची मला कल्पना आहे. पण आपली चूक मान्य करत नसतील आणि जबाबदारीच घेत नसतील तर राजीनाम्याची मागणी हे या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे.

आपली मुले राजकारणावर बोलतात याची आता आई-वडिलांना भीती वाटते. मी अमेरिकेला जाताना आई जेवढी रडली नव्हती, तेवढी ती मी परत आल्यावर रडली. तिला भीती होती की, माझ्यावर हल्ला होईल. ही भीती प्रत्येक आई-वडिलांना वाटत आहे. पण आणखी किती वर्षे आम्ही विद्यार्थ्यांच्या आत्महत्या पाहायच्या? माझे एकच सांगणे आहे की, मुलांना बोलण्यापासून रोखू नका. हजारो, लाखो विद्यार्थी बोलायला लागतील तेव्हा त्यांचा आवाज दाबण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. सरकारची भीती बाळगू नका. सरकार अटक करणार असेल तर सर्वांच्या आधी मी स्वतःला अटक करून घेईन. तुमच्या मुलांना त्रास होऊ देणार नाही. प्ले स्टेशन खेळता खेळता सुरू झालेल्या या चळवळीला आता अत्यंत व्यापक स्वरूप आले आहे. ही चळवळ केवळ समाज माध्यमांपुरती मर्यादित न ठेवता, आता ती जमिनीवर आणून थेट आंदोलन सुरू करायचे आहे. विद्यार्थ्यांच्या या लढ्यासाठी मी अमेरिकेतील माझी नोकरी सोडून दिली असून, आता भारतातच कायमस्वरूपी राहून हा लढा पुढे नेणार आहे, असा निर्धारही अभिजीत दीपकेने बोलून दाखवला. विशेष म्हणजे. कॉकरोच पार्टीने दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर केलेल्या पहिल्या आंदोलनाला सोशल मीडियावर कोट्यवधी फॉलोअर्स असूनही केवळ ६ ते ७ हजार तरुण उपस्थित होते, अशी कबुली दीपकेनेच दिली होती. त्यामुळे आता देशव्यापी आंदोलनाला तरी चांगला प्रतिसाद मिळणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.


**मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**

**निविदा करिता विनंती- MRVC-W-401**

**(सिंगल टप्पा एक लिफाफा ई-खरेदी निविदा प्रक्रिया)**

मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-400020 येथे आहे, यांचे द्वारे "**मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील MUTP-IIIB अंतर्गत बदलापूर ते कर्जत स्थानकापर्यंतच्या विभागांवर पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी फलाटांवरील विद्युत (सामान्य सेवा) कामे**" ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज ई-खरेदी वेबसाइट **https://eprocure.gov.in.** वर उपलब्ध आहेत. पूर्ण भरलेली ई-निविदा वेबसाईट **https://eprocure.gov.in.** वर जमा करण्याची शेवटची तारीख **10.07.2026 रोजी दु. 15:00 वा. पर्यंत आहे. शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वेबसाइट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**



**कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस**

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते की, **श्री. प्रियल के. पटेल, संचालक, मे. राजेश हौसिंग प्रा. लि. सिटीएस नं. ६७, एल. बी. एस. मार्ग, मौजे विक्रोळी, (पश्चिम), मुंबई ४०० ०८३.** सदर जागेवर कोणतीही आस्थापना नसल्यामुळे सदर भुखंड मोकळा असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, एन प्रभाग यांना कळविले आहे. या जागेचे क्षेत्रफळ **१२७४.६१ चौ. मी.** असून तत्सम कुर्ला, नगर भुमापन कार्यालयातील नोंदीनुसार मिळकतीचे मालक आहोत आणि तिचा विद्यमान वापर बदलुन सदर मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. तरी देखील **मे. राजेश हौसिंग प्रा. लि. सिटीएस नं. ६७, एल. बी. एस. मार्ग, मौजे विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०८३.** या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर पूर्व यांचे कार्यालय, कामगार भवन, प्लॉट क्र. सी-२०, ब्लॉक-ई, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

**स्थळ-मुंबई**
**दिनांक-११/०६/२०२६**

**सही-**
**मे. राजेश हौसिंग प्रा. लि.,**
**(संचालक)**



**नोटीस**
**शेअर सर्टिफिकेट हरवले आहे**

मी, अंकुश शंकर नाईक रहाणार रुम नं. २०१, प्रगती एस आर ए को. ऑप. हौसिंग सोसायटी, प्रगती नगर, वाकोला, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई – ४०००५५ नावे असलेले शेअर सर्टिफिकेट हरवले आहे. शेअर सर्टिफिकेट नं. २०, मेंबर रजिस्टर नं. २०१, १० शेअर्स डिस्टिंक्टीव्ह नं. १९१ ते २०० कोणाला सापडल्यास कृपया वरील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत संपर्क साधावा.

दिनांक : ११/०६/२०२६

सही/–
अंकुश शंकर नाईक



**नोटीस**

आम्ही श्री. गणेश पांडुरंग कालवणकर व दिपा प्रकाश कालवणकर, आराधना एस. आर. ए. को. ऑ. हौसिंग सोसायटी फ्लॅट नं. ३०५, टर्नर रोड, वांद्रे तलावासमोर, वांद्रे पश्चिम – ४०००५० माझे वडील कै. पांडुरंग पुनाजी कालवणकर (०६/१०/२०१५), आई कै. रुक्मिणी पांडुरंग कालवणकर (२३/०५/२०१९) आणि भाऊ कै. प्रकाश पांडुरंग कालवणकर (२६/०३/२००२), कै. अशोक पांडुरंग कालवणकर (०८/०२/२००९) यांचे निधन झाले असून वरील जागा आमच्या दोघांच्या नावावर करण्यासाठी सोसायटीत अर्ज केला आहे, तरी कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत सोसायटीच्या कार्यालयात लेखी द्यावे ही विनंती

दिनांक : ११/०६/२०२६

नवाकाळ





# चंद्रावरच्या आर्टेमिस-३ मोहिमेकरिता नासाकडून अंतराळवीरांची नावे जाहीर

■ वॉशिंग्टन

**चंद्रावर** मानवाच्या पुनरागमनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत नासाने २०२७ मध्ये होणाऱ्या आर्टेमिस-३ मोहिमेची नवीन माहिती जाहीर केली आहे. या मोहिमेसाठी चार मुख्य अंतराळवीर आणि एका राखीव सदस्याची निवडही घोषित करण्यात आली आहे. ही मोहीम २०२८ मध्ये नियोजित असलेल्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील पहिल्या मानवी मोहिमेपूर्वी महत्त्वाच्या चाचण्या पार पाडणार आहे.

नासा आर्टेमिस-३ मोहिमेची सविस्तर माहिती देताना अंतराळवीर रँडी ब्रेसनिक यांची कमांडर, लुका पर्मितानो यांची पायलट, तर आंद्रे डग्लस आणि फ्रँक रुबिओ यांची मिशन स्पेशालिस्ट म्हणून नियुक्ती जाहीर केली. तसेच बॉब हाइन्स यांची राखीव सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, आर्टेमिस कार्यक्रमात प्रथमच युरोपियन स्पेस एजन्सीच्या अंतराळवीराचा समावेश करण्यात आला आहे. आर्टेमिस-३ मोहिमेत नासाचे शक्तिशाली स्पेस लॉन्च सिस्टम रॉकेट फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटरमधून ओरायन अंतराळयान पृथ्वीच्या कक्षेत जाईल. त्यानंतर ओरायन प्रथमच ब्लू ओरिजिन आणि स्पेसएक्स या कंपन्यांनी विकसित केलेल्या चंद्र लँडरच्या चाचणी आवृत्त्यांशी अवकाशात डॉकिंग करेल. या प्रक्रियेत सॉफ्टवेअर, कम्युनिकेशन, आणि इतर महत्त्वाच्या प्रणालींची चाचणी घेतली जाणार आहे. मोहिमेच्या आराखड्यानुसार प्रथम ब्लू ओरिजिनचा लँडर पृथ्वीच्या कक्षेत पाठवला जाईल. त्यानंतर अंतराळवीरांसह ओरायन अंतराळयान अवकाशात जाऊन त्या लँडरशी जोडले जाईल. सुमारे दोन दिवस विविध तांत्रिक चाचण्या आणि प्रात्यक्षिके केल्यानंतर ओरायन स्पेसएक्सच्या स्टारशिप लँडरशीही भेट घेईल. सर्व चाचण्या पूर्ण झाल्यानंतर अंतराळवीरांसह ओरायन पृथ्वीवर परत येऊन पॅसिफिक महासागरात सुरक्षित उतरेल. नासाचे प्रशासक जॅरेड आयझॅकमन यांनी सांगितले की, आर्टेमिस-३ मोहीम अमेरिकन नवोन्मेष आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रतीक ठरणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# सरकारने आम्हाला हलक्यात घेऊ नये मनोज जरांगेंचा फडणवीसांना इशारा

■ बीड

**मराठा** आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्र वाटपाच्या मुद्यावरून मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पुढचा काळ जड जाईल. आम्हाला हलक्यात घेऊ नका, असा इशारा त्यांनी दिला. आंतरवली सराटी येथील आंदोलनानंतर परतताना अपघातग्रस्त झालेल्या एका



मराठा कार्यकर्त्याची बीडमधील रुग्णालयात भेट घेतल्यानंतर ते बोलत होते.

जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाचा अवमान करणाऱ्यांना २०२९ च्या निवडणुकीत जनतेसमोर उत्तर द्यावे लागेल. सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पुढचा काळ जड जाईल. आम्ही ओबीसी समाजाचे आरक्षण काढून आम्हाला द्या, अशी मागणी करत नाही. आम्ही आमच्या हक्काचे आरक्षण मागत आहोत. बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात मराठा समाजाच्या नोंदी सापडल्या होत्या.

# खरात प्रकरणात चाकणकरांची मिरगेंविरोधात फौजदारी तक्रार

■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आपल्यावर झालेले आरोप फेटाळत राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपली बाजू पुन्हा एकदा मांडली. खरातशी माझा कोणताही आर्थिक संबंध नसून, त्याच्या कोणत्याही जमीन व्यवहारात माझी भागीदारी नव्हती, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्य आशा मिरगे यांनी केलेल्या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर चाकणकरांनी त्यांच्याविरोधात फौजदारी तक्रार दाखल केली आहे. चाकणकर महिलांना खरातकडे घेऊन जात असत, असा आरोप मिरगेंनी केला होता.

चाकणकर म्हणाल्या की, अशोक खरात प्रकरणात पहिल्या दिवसापासून माझी भूमिका स्पष्ट आहे. माझा त्याच्या कोणत्याही आर्थिक व्यवहाराशी किंवा जमीन व्यवहाराशी दुरान्वयेही संबंध नाही. तरीदेखील गेल्या दीड-दोन महिन्यांपासून कोणताही पुरावा नसताना माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर अश्लील आणि असभ्य भाषेत आरोप करण्यात आले. माझ्या कुटुंबियांनी इतरांप्रमाणे खरातला गुरू मानले होते. त्यामुळे पाद्यपूजेचा व्हायरल झालेला व्हिडिओ जुना आहे.

# गोरेगाव नेस्को ड्रग प्रकरण फक्त हिमनगाचे टोक

राज्य सरकारचा दावा

■ मुंबई

**गोरेगाव** येथील नेस्को एक्झिबिशन सेंटरमध्ये झालेल्या ड्रग प्रकरणात समोर आलेली बाब ही अमली पदार्थांच्या मोठ्या जाळ्याचे केवळ 'हिमनगाचे टोक' (छोटासा भाग) असल्याचा गंभीर दावा राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात केला आहे. या प्रकरणातील आरोपींच्या जामीन अर्जाला विरोध करताना सरकारी वकिलांनी ड्रग माफियांच्या आंतरराष्ट्रीय जाळ्याबाबतही महत्त्वाची माहिती न्यायालयासमोर मांडली.

एप्रिल महिन्यात नेस्को येथे आयोजित म्युझिक कॉन्सर्टदरम्यान ड्रग ओव्हरडोसमुळे दोन जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू करत सह-आयोजक बाळकृष्ण कुरूप आणि व्यवस्थापक सन्नी जैन यांना अटक केली होती. दोघांनी आपल्या अटकेला आव्हान देत आणि या प्रकरणाशी संबंध नसल्याचा दावा करत जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. मात्र, राज्य सरकारने या जामीन अर्जाला जोरदार विरोध केला आहे. तपासादरम्यान जप्त करण्यात आलेले अमली पदार्थ, आर्थिक व्यवहारांची गुंतागुंत आणि आरोपींचे संभाव्य संबंध यावरून हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे सरकारने नमूद केले.

# ईडीने साक्षीदाराऐवजी आरोपी ठरवले जॅकलिनची सर्वोच्च न्यायालयात धाव

■ नवी दिल्ली

**अभिनेत्री** जॅकलिन फर्नांडिस हिने २०० कोटी रुपयांच्या कथित मनी लाँडरिंग प्रकरणात तिच्याविरोधात पीएमएलए अंतर्गत आरोप निश्चित करणाऱ्या ३० मे रोजीच्या विशेष न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ठग सुकेश चंद्रशेखर याच्याशी संबंधित या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर सुनावणी करण्यास सहमती दर्शवली असून उद्या ही सुनावणी होणार आहे.

अभिनेत्रीच्या वतीने बाजू मांडताना ॲडव्होकेट रमीझा हकीम यांनी न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि ए. एस. चंदुरकर यांच्या खंडपीठास सांगितले की, एकाच आरोपांच्या आधारे सुरू असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट विरोधाभास आहे. सीबीआयकडून तपासल्या जाणाऱ्या मूळ गुन्ह्यात जॅकलिनची साक्षीदार म्हणून नोंद करण्यात आली आहे. मात्र त्याच प्रकरणाशी संबंधित पीएमएलए प्रकरणात ईडीने तिला आरोपी केले आहे. जॅकलिन ईडीच्या प्रकरणात सरकारी साक्षीदार होण्यास तयार आहे. तसेच



खटल्याची सुनावणी लवकरच सुरू होण्याची शक्यता असल्याने तातडीने सुनावणी घेण्याची विनंती त्यांनी खंडपीठाला केली.

# आदर्श नगर, वांद्रे रिक्लेमेशन पुनर्विकासाविरोधात याचिका

■ मुंबई

**वरळीतील** आदर्श नगरमधील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांनी महाराष्ट्र सरकारच्या आदर्श नगर आणि वांद्रे रिक्लेमेशन येथील म्हाडा वसाहतींच्या क्लस्टर पुनर्विकासाच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांनी याचिकेत असे म्हटले आहे की, या धोरणामुळे त्यांच्या पुनर्विकास आणि मालमत्तेच्या अधिकारांवर गदा येत आहे.

या याचिकांद्वारे २५ एप्रिल २०२५ आणि १५ डिसेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयांना आव्हान देण्यात आले आहे. या निर्णयांनुसार संबंधित वसाहतींचा एकात्मिक क्लस्टर पुनर्विकास करण्याची तरतूद आहे. उच्च न्यायालयाने काल या प्रकरणातील युक्तिवाद सविस्तर ऐकून घेतले. याचिकाकर्त्यांच्या वतीने हजर असलेल्या वरिष्ठ वकिलांनी असा युक्तिवाद केला की, या शासन निर्णयांमुळे गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या सदस्यांच्या वैयक्तिक संमतीशिवाय क्लस्टर योजनेत सहभागी होण्यास भाग पाडले जात आहे. धोरणात संस्थेचा ठराव आवश्यक मानला असला तरी प्रत्येक सदस्याची स्वतंत्र संमती घेण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

# मुंब्रा रेल्वे अपघाताला वर्ष उलटले पीडितांना अद्याप भरपाई नाहीच

■ मुंबई

**रेल्वे** आणि पोलीस प्रशासनाच्या चालढकलीच्या धोरणाचे आणखी एक संतापजनक उदाहरण दिसून आले आहे. मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या अपघाताला ९ जून रोजी एक वर्ष पूर्ण झाले. मात्र या प्रकरणाचा तपास एवढ्या संथगतीने सुरू आहे की, वर्षभरानंतरही अपघाताचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे पाच प्रवाशांच्या मृत्यूचे गूढ अजून उलगडलेले नाही आणि मृतांच्या नातेवाईकांना अजिबात नुकसान भरपाई मिळालेली नाही.

९ जून २०२५ रोजी मुंब्रा स्थानकाजवळील वळणावर दोन विरुद्ध दिशेने धावणाऱ्या लोकल अगदी जवळ आल्याने दोन्ही गाड्यांमधील दरवाजांमध्ये उभे असलेले आठ प्रवासी एकमेकांवर आदळून रुळावर पडले. तर काही प्रवासी डब्यातच जखमी झाले. रुळांवर पडलेल्या प्रवाशांपैकी पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. तर १३ प्रवासी जखमी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडून (सीएसएमटी) कसाऱ्याकडे जाणारी लोकल आणि कर्जतहून सीएसएमटीकडे जाणारी लोकल एकाच वेळी या धोकादायक वळणावर पोहोचल्यामुळे हा अपघात झाला होता. शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी) या अपघाताचा तपास करत आहेत.

# दादांची पोकळी जाणवते! सुनेत्रा पवारांची भावनिक पोस्ट

■ नवी दिल्ली

**राष्ट्रवादी** काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आज नवी दिल्लीतील राष्ट्रीय



कार्यालयात नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. तर एक्सवर दादांची पोकळी जाणवते, अशी भावुक पोस्ट करत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर पक्षाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांच्या नेतृत्वात साजरा होणारा हा पहिलाच वर्धापन दिन असून, खासदार पार्थ पवार, युवक प्रदेशाध्यक्ष धीरज शर्मा यांच्यासह अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. » पान ७ वर

# 'गोकुळ'ने ३० कोटींचे बिल थकवले शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

■ सोलापूर

**गोकुळ** साखर कारखान्याकडून सुमारे १३० कोटी रुपयांची ऊस बिले थकवण्यात आल्याच्या निषेधार्थ सोलापुरात शेतकऱ्यांनी छत्रपती संभाजी महाराज तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले.

गेल्या १७ दिवसांपासून शेतकऱ्यांचे उपोषण सुरू आहे, असे असतानाही ठोस निर्णय न झाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी तलावाकडे मोर्चा वळवला. पोलिसांनी लावलेले बॅरिकेड दूर करत शेतकऱ्यांनी थेट पाण्यात उतरून घोषणाबाजी सुरू केली. 'आम्हाला आमचे हक्काचे पैसे हवे आहेत,' अशी



ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. काही अधिकाऱ्यांनी पाण्यात उतरून शेतकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शेतकरी संघटनांच्या म्हणण्यानुसार, सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील हजारो ऊस उत्पादकांचे पैसे प्रलंबित आहेत.

# मुंबई-पुणे महापौर कार्यालयांसह नागपूरच्या संघ मुख्यालयाला धमकी

■ मुंबई

**मुंबई** आणि पुणे येथील महापौर कार्यालयांसह नागपूरमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल मिळाल्याने राज्यभरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पोलीस, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच सायबर विभाग सावध झाला असून सर्व संवेदनशील ठिकाणी सुरक्षा कडक करण्यात आली.

मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर पाठवण्यात आलेल्या धमकीत त्यांच्या वाहनासह त्यांच्या महापौर कार्यालयाला लक्ष्य करण्यात येणार असल्याचे म्हटले होते. पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्याही अधिकृत ई-मेलवर पुणे महापौर कार्यालय, विधानभवन आणि नागपूरमधील रेशीमबाग येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला लक्ष्य करण्याची धमकी देण्यात आली होती. ई-मेलमध्ये आयईडी बॉम्बस्फोटाचा उल्लेख करण्यात आला असून काही ठिकाणी विशिष्ट वेळा आणि तारखाही नमूद करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, पुणे महापौर कार्यालयात दुपारी १.११ वाजता, तर पुण्यातील विधानभवन आणि नागपूर येथील मुख्यालय येथे दुपारी ३.११ वाजता स्फोट घडवण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# देशातील ५६ न्यायाधीश लंडनमध्ये सरकारी खर्चाने पार्ट्या करताहेत

खासदार संजय राऊतांचा दावा

■ मुंबई

**देशातील** ५६ न्यायाधीश सध्या लंडनमध्ये सरकारी खर्चाने देशाच्या मंत्र्यांबरोबर पार्ट्या करत असून तिथे बॅडमिंटन खेळत असल्याचा खळबळजनक दावा उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी आज केला.

संजय राऊत म्हणाले की, देशाच्या इतिहासात कधीही घडली नाही, अशी गंभीर परिस्थिती सध्या देशात निर्माण झाली आहे. देशातील उच्च न्यायालयाचे आणि सर्वोच्च न्यायालयाचे तब्बल ५६ न्यायाधीश सध्या लंडनमध्ये सरकारी खर्चाने



देशाच्या मंत्र्यांबरोबर पार्ट्या करत असून तिथे बॅडमिंटन खेळत आहेत. या सगळ्या दौऱ्याचा खर्च कोण करते आहे आणि राजकारण्यांबरोबर न्यायाधीशांची उठबस का सुरू आहे? आता या पार्टीत कदाचित देशाचे मुख्य निवडणूक आयुक्तसुद्धा सहभागी होतील. गेल्या १२ वर्षांतील मोदी सरकारची कमाई म्हणजेच न्यायाधीशांचे हे लंडन दौरे आणि राजकारण्यांसोबतच्या पार्ट्या आहे. पंडित नेहरू, इंदिरा गांधी किंवा मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात न्यायव्यवस्थेने राजकीय व्यवस्थेपासून नेहमीच अंतर राखले होते, पण आज ते एकाच ताटात जेवण करत आहेत. देशाच्या न्यायव्यवस्थेची इतकी बकवास अवस्था नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी केली आहे.

# व्याघ्र मार्गिकेतील खाण प्रकल्प रद्द करा! आदित्य ठाकरेंची मागणी

■ नागपूर

**गडचिरोली** जिल्ह्यातील ताडोबा-इंद्रावती व्याघ्र मार्गिकेत प्रस्तावित लोहखनिज खाण प्रकल्पाला राज्य शासनाने दिलेल्या परवानग्यांवर उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी तीव्र आक्षेप घेत केंद्र सरकारकडे प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने (एनटीसीए) मान्यता दिलेल्या व्याघ्र मार्गिकेचे अस्तित्व नाकारून प्रकल्पाला वन्यजीव मंजुरीतून सवलत देण्यात आल्याचा आरोप ठाकरे यांनी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांना पाठविलेल्या पत्रात केला आहे. या पत्रात आदित्य ठाकरे यांनी एटापल्ली तालुक्यातील हेद्री, बांदे, पारसलगोंडी आणि राऊंड-पारसलगोंडी परिसरातील लोहखनिज उत्खनन प्रकल्पाचा उल्लेख केला आहे.

या प्रकल्पासाठी भामरागड राखीव वनातील सुमारे ९३७ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव असून, त्यासाठी अंदाजे १.२३ लाख झाडांची तोड करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकल्पाला १५ एप्रिल रोजी वनमंजुरी आणि १२ मे रोजी पर्यावरणीय मंजुरी देण्यात आली.

ग्रेट निकोबार बेटावर विमानतळ उभारण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. बेटावरील गॅलाथिया बे जवळील चिंगेन येथे नवा विमानतळ उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १३ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पाला स्थानिक आणि पर्यावरणवाद्यांनी विरोध केला आहे. शिवाय या भागात विमानतळ उभारणार तिथे भूकंप होऊ शकतो, असा परिसर असूनही सरकारने या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे.

# पर्यावरणवाद्यांच्या विरोधानंतरही निकोबार बेटावर विमानतळास केंद्राची मंजुरी

■ नवी दिल्ली

**एकूण** १६६.१० चौरस किलोमीटर क्षेत्रावर हा ग्रेट निकोबार प्रकल्प साकारण्यात येत आहे. यामध्ये १४.२ दशलक्ष टीईयू क्षमतेचे आंतरराष्ट्रीय कंटेनर टर्मिनस, तासाला ४ हजार प्रवासी हाताळण्याची क्षमता असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ, ४५० मेगावॅट क्षमतेचा गॅस-सौरऊर्जा प्रकल्प आणि १६ हजार ६१० हेक्टरवर विस्तारलेले नियोजित शहर यांचा समावेश आहे. नवा



विमानतळ हा त्याचाच भाग आहे.

या विमानतळाचा नागरी आणि लढाऊ विमाने या दोन्हींसाठी वापर करता येईल अशी त्याची रचना करण्यात येणार असल्याचा दावा सरकारने केला आहे. या विमानतळामुळे आता कॅम्पबेल बे येथील सध्या असलेल्या आयएनएस बाझ विमानतळाच्या विस्ताराचा प्रस्ताव रद्द करण्यात येणार आहे. आयएनएस बाझच्या ४ हजार ५०० फुटांच्या धावपट्टीचा १० हजार फुटांपर्यंत विस्तार करण्याचा प्रस्ताव होता.

# एमपीएससीच्या निकालाआधीच मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर

■ नागपूर

**महाराष्ट्र** लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भरती प्रक्रियेचा लेखी परीक्षेचा निकाल अद्याप जाहीर झालेला नसतानाच आयोगाने संबंधित पदांसाठी मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर केल्याने उमेदवारांमध्ये संभ्रम व नाराजी पसरली आहे. एमपीएससीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वरिष्ठ सहायक संचालक, वरिष्ठ उपसंपादक व जनसंपर्क अधिकारी (गट-अ) पदांसाठी १६ व १७ जून रोजी मुंबई येथे मुलाखती आयोजित केल्या आहेत. या पदांसाठी झालेल्या लेखी परीक्षेचा निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही.

# खड्डे बुजवण्यासाठी ६० कोटी रुपये स्थायी समितीत वादळी चर्चा होणार

■ मुंबई

**मुंबई** महापालिका परिमंडळ १ ते ७ मधील रस्त्यांवरील खड्डे आणि पूर्व, पश्चिम उपनगरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठीच्या कामांचे तब्बल ६०.११ कोटी रुपयांचे १६ प्रस्ताव शुक्रवारी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहेत. या प्रस्तावावरून स्थायी समितीत वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

पावसाळा आता सुरू होत असून या पार्श्वभूमीवर मुंबईतील सातही परिमंडळांमधील रस्त्यांच्या डागडुजीसाठी एकूण १६ स्वतंत्र प्रस्ताव मंजुरीसाठी



स्थायी समितीसमोर मांडण्यात येणार आहेत. पूर्व द्रुतगती मार्गावरील खड्डे बुजवण्यासाठी १९.१७ कोटी रुपये आणि पश्चिम द्रुतगती मार्गावरील कामांसाठी १८.८८ कोटी रुपये खर्च केले जातील. या दोन्ही प्रमुख मार्गांसाठी मिळून एकूण ३८.०५ कोटी रुपयांचे दोन स्वतंत्र प्रस्ताव आहेत. परिमंडळ १ ते ७ मधील ९ मीटरपेक्षा कमी आणि जास्त रुंदीच्या स्थानिक रस्त्यांवरील खड्डे दुरुस्तीसाठी उर्वरित २२.०५ कोटी रुपयांचे १४ प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवले जाणार आहेत. महापालिकेने मुंबईतील शेकडो किलोमीटर रस्त्यांचे आधीच काँक्रीटीकरण केल्याचा दावा केला आहे.